नामवंतांचे विनोद

आनंद घोरपडे



नामवंतांचे विनोद

विविध क्षेत्रांतील नामवंतांच्या

विनोदी किश्श्यांची मैफल !

संकलन

आनंद घोरपडे

रोहन प्रकाशन

संस्थापक : मनोहर चंपानेरकर

Namvantanche Vinod
नामवंताचे विनोद

प्रकाशन क्र. : १६०
प्रथमावृत्ती : एप्रिल २००३
पुनर्मुद्रण : २००५, २००७, २००९,
२०१४

प्रकाशक / मुद्रक
प्रदीप चंपानेरकर
रोहन प्रकाशन
धवलगिरी, ४३० शनिवार पेठ
पोलीसचौकी समोर, पुणे ४११ ०३०.
✆ २४४८०६८६
मुंबई : शॉप १ ब, स्वामी समर्थ नगर
काऊ लेन, गिरगाव, मुंबई ४००००४.
✆ २३८९२३७८

मूल्य : पस्तीस रुपये (Rs. 35)

मुखपृष्ठ
मंगेश तेंडुलकर
प्रोसेसिंग : एक्स्ट्रिम डिझाईन्स

अक्षरजुळणी
एच्. एम्. टाइपसेटर्स
पुणे ४११०३०.

मुद्रणस्थळ
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०.

ISBN 81-86184-83-4

मिश्किलीशी जेथे नाते
तेथे मन माझे मोहरते–
जीवन हा संघर्ष असे जरी
कष्टाविना कधी मिळे न भाकरी
कौतुकमय होऊनि या भूवरी
फुलविती अधरी मधुस्मिताते
तेथे मन माझे मोहरते.

माझ्या जीवनाशी सर्वार्थाने एकरूप झालेली
माझी पत्नी– सौ. हेमलतास

– *आनंद*

अनुक्रम

■

मनोगत

खास 'औरस' विनोदावरची माझी दोन संकलनात्मक पुस्तकं प्रकाशित झाल्यावर सुप्रसिद्ध लेखक शंकर सारडा यांनी 'मी या तऱ्हेचे प्रयत्न सुरूच ठेवावेत,' असे म्हणून मला उत्तेजन दिलं. या पुस्तकांचे प्रकाशक म्हणजे 'रोहन प्रकाशन'चे प्रदीप चंपानेरकर यांनी दिलेला अभिप्रायही प्रोत्साहित करणाराच होता. त्यामुळे या तिसऱ्या संकलनाचे काम मी उत्साहाने हाती घेतले व यथावकाश पूर्ण केले. विनोदी संकलनाची 'त्रिसूत्री' साकार व्हावी या हेतूने मी 'रोहन प्रकाशन'कडे हे तिसरे संकलन सुपूर्द केले.

काय आहे की, साहित्यिक, लेखक, प्रतिभावान, कथाकार आपली पुस्तकं प्रकाशित करतच असतात. लिखाणाप्रमाणेच त्यांच्या भाषणातून, आचरणातूनही काही समयोचित, उत्स्फूर्त विनोदाची निर्मिती होत असते. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात असे विनोदही प्रसिद्ध झालेले असतात; पण असे प्रत्येक पुस्तक, लेख, संदर्भ वाचकांच्या हाती पडतीलच याची शक्यता कमी असते. त्यामुळे असे विनोद, किस्से वेचून त्यांचे संकलन केले की ते एकत्रितपणे वाचकांच्या समोर येतात आणि स्वाभाविकच त्यांची सोय होते. तसेच वाङ्मयप्रांतात फारशी गती नसलेल्या माझ्यासारख्या प्रयत्नशील माणसाला या संकलनाद्वारे साहित्याची थोडीफार सेवा केल्याचे श्रेयही प्राप्त होते !

ही सर्व 'औरस' विनोदांची उठाठेव करत असताना एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली की, असे विनोद उत्स्फूर्ततेचे, समयसूचकतेचे द्योतक असले, तरी चुटके वा हास्यकथांच्या स्वरूपातल्या काल्पनिक विनोदांची लज्जत जरा वेगळी असते. सामान्यजनही असे काल्पनिक विनोद विशेष लक्षात ठेवून प्रसंगी त्यांचा वापर करीत असतात. अशा काल्पनिक विनोदांमध्ये प्रतिभावंतांनी साधलेली परिणामकारकता नसली, तरी असे विनोद अधिकतर प्रचारात असतात. गमतीची गोष्ट म्हणजे असे विनोद प्रवाही होत राहतात; मात्र त्यांच्या उत्पत्तिकाराची काही नोंद राहत नसते. वास्तविक काल्पनिक विनोदांनाही काही मूलस्रोत असतात; पण हे

विनोद इतके बेमालूमपणे केलेले असतात की ते मूळ कोणत्या विनोदावर बेतले हे सांगणे मुश्किलच असते. प्रसिद्ध लेखक भा. ल. महाबळ अशा विनोदांना 'हसरी चोरी' असं मार्मिकपणे संबोधतात. बऱ्याच वेळा इंग्रजीमधील हास्यरसप्रधान काल्पनिक विनोदांमधून प्रेरणा घेऊन काही जण आपल्या देशातील संदर्भ, स्थळ-काळ-परिस्थितीशी त्यांचा सांधा जुळवतात आणि 'नवीन'च काल्पनिक किस्सा तयार करतात; पण प्रत्येक विनोदाचं असं असेलच असं काही ठामपणे सांगता येत नाही. काही वेळा आपला 'देशी' विनोद आणि आपण ऐकलेल्या 'परदेशी' संदर्भातील काल्पनिक चुटका यांत साधर्म्य आढळते. पण अर्थात त्याचीही वेगळी गंमत असते. कधी ते जमून गेलेले असतात, तर कधी फसतात.

डॉ. अभय बंग यांनी 'साप्ताहिक सकाळ' मध्ये एक हास्यकथा सांगितली होती. ती साधारण अशी होती–

एकदा एक कारखानदार व्यस्त जीवनातून शांतता लाभावी या दृष्टीने सुटी काढून गडचिरोलीच्या जंगल-परिसरात मुक्कामी आला. जंगलामध्ये फिरत असताना त्याला एका ओढ्याच्या किनारी एक आदिवासी झाडाला टेकून निश्चितपणे पहुडलेला दिसला. मुंबईचे धावपळीचे जीवन जगणाऱ्या त्या उद्योगपतीला असं वाटलं की, तो आदिवासी आपला वेळ निरर्थक दवडतोय. त्याच्या जवळ जाऊन तो म्हणाला, 'असा आळश्यासारखा पडलायस काय नुसता?' त्या आदिवासी माणसाला काही त्या प्रश्नाचा संदर्भ लागला नाही. त्याने विचारले, 'का? काय झालं?'

'ऊठ आणि काही काम कर.' कारखानदार म्हणाला.

'त्याने काय होईल?' आदिवासीने पृच्छा केली.

'म्हणजे काम केल्यामुळे तुला पैसे मिळतील.'

'त्यानं काय होईल?' पुन्हा आदिवासीचा प्रश्न.

'काय होईल म्हणजे? तुला काय काय विकत घेता येईल.'

'त्यानं काय होईल?'

'तुला माझ्यासारखी गाडी घेता येईल.'

'त्यानं काय होईल?'

'तुला जंगलात गाडीने फिरता येईल माझ्यासारखं. मस्त राहता येईल.' असं कारखानदार म्हणताच आदिवासी पटकन उत्तरला, 'मी तेच तर आता करतोय !'

याच धर्तीवरचा एक किस्सा अमेरिकेत इंग्रजी भाषेत प्रचलित आहे. फक्त पात्रं वेगळी आहेत. एक म्हणजे दस्तुरखुद्द संगणकसम्राट बिल गेटस् आणि आदिवासीच्या जागी एका कोळ्याची योजना केली आहे. माझ्या मते मूळ विनोदकाराने केलेल्या काल्पनिक विनोदात अधिक सहजता आढळते. वरील विनोदात त्याचे 'देशीकरण' केले तरी त्यात तेवढी सफाई व सहजता आढळत नाही.

याच संदर्भात एक मूळ पाश्चात्त्य किस्सा सांगतो. त्यावरून मूळ काल्पनिक विनोदाच्या सफाईचा अंदाज येईल.

एकदा एक छोटेसे यात्री-विमान दुर्घटनाग्रस्त होऊन एका निर्जन प्रदेशात कोसळलं. फक्त एक तरुण आणि तरुणीच या अपघातातून सुखरूप बाहेर पडली. संध्याकाळची वेळ होती म्हणून जवळपास एखादं निवाऱ्याचं स्थान ती दोघं शोधू लागली. त्यांना एक झोपडी आढळली. तिथे आत एका बाकाशिवाय काहीच नव्हतं; पण रात्र तिथे घालविण्याशिवाय गत्यंतर नव्हतं:

'खोलीत परका माणूस असताना कसं झोपायचं बाई? मी तर रात्रभर अशीच बसून राहणार.' ती तरुणी कुरकुरत म्हणाली.

'तुम्ही मुळीच घाबरू नका. आपण हे गुडघ्याएवढं उंच असलेलं बाकडं मधे ठेवू आणि दोघं दोन बाजूंना झोपू. तुम्हांला कशाचाही धोका नाही.'

तरुणानं आश्वासन दिलं.

सकाळी उठल्यावर दोघं पुढचा कार्यक्रम आखू लागली; पण भूक लागली असल्यानं काही सुचत नव्हतं. एवढ्यात जवळच फळांनी लहडलेलं एक चेरीचं झाड त्यांना दिसलं. मात्र त्याच्या भोवती एक कमरेएवढं उंच कुंपण होतं.

'काय सुंदर चेरीज आहेत !' तरुणी म्हणाली. त्यावर उत्साहानं तरुण उद्गारला, 'मी आत्ता तोडून आणतो त्या ! हे काय एवढंसं तर कुंपण आहे. मी सहज उडी मारून जाऊ शकेन.'

त्यावर तरुणीनं त्याला फटकारलं, 'हूंऽऽ, आले मोठी उडी मारणारे, तुम्हांला काय जमणार? रात्री गुडघाभर उंचीचं बाकडं तुम्ही ओलांडू शकला नाहीत आणि म्हणे कमरेएवढ्या उंचीवरून उडी मारणार !'

ही जुनी हास्यकथाही मुळात मराठी नसून पाश्चात्त्य असण्याची शक्यता वाटते, पण त्यातही बदल करून ती आपल्या नावे प्रसिद्ध करता यावी म्हणून माझ्या एका मित्राने त्यात बदल करून कथेत तरुण-तरुणीच्या बाकड्याऐवजी उशी ठेवण्याचे सांगितले आणि मूळ हास्यकथेतील मजाच निघून गेली.

काही काही परदेशी हास्यकथांचं देशीकरण करणं सोपं नसतं आणि त्या मुळातच अधिक भावणाऱ्या असतात. याचं एक कारण म्हणजे तेथील वेगळी परिस्थिती आणि दुसरं म्हणजे योग्य साम्यस्थळं मिळण्यातील भासणारी अडचण. उदाहरण द्यायचं झालं तर एका पाश्चात्त्य विनोदाचं देता येईल–

अमेरिकेचं एक प्रेस डेलिगेशन चीनला जातं व माओची भेट घेतं. त्यावेळी रशियात क्रुश्चेव्हचं राज्य असतं आणि माओ व क्रुश्चेव्ह यांचं जमत नसतं. प्रेस डेलिगेशनमधील एक जण माओला विचारतो की, 'केनेडींच्या ऐवजी क्रुश्चेव्हचा खून झाला असता तर काय झालं असतं?'

माओ थोडा वेळ विचार करतो आणि म्हणतो, 'मला नाही वाटत

ॲरिस्टॉटल ओनेसिसने मिसेस क्रुश्चेव्हशी लग्न केलं असतं !'

आता इथे याचं मराठीकरण नाव बदलून करायचं झालं तर तशी साम्य असलेली व्यक्तिमत्त्वं इथे सापडणं कठीण.

पाश्चात्त्य विनोदाचे देशीकरण करण्यात जशी अडचण येते त्याचप्रमाणे आपल्या देशी विनोदाचे पाश्चात्त्यीकरण करण्यातही अडचण येऊ शकते. उदाहरणार्थ, आपल्याकडील एका विनोदामध्ये एक बंगाली व एक पंजाबी यांच्यांत वाद होतो. दोघेही ठामपणे म्हणतात की त्यांच्या त्यांच्या प्रांतामध्ये भारताच्या स्वातंत्र्याकरिता प्राण देणारे अधिक आहेत. मग ठरते की एकाने त्याच्या प्रांतातील शहीद झालेल्या एका हुतात्म्याचे नाव घ्यायचे आणि दुसऱ्याचे दाढीतील एक केस उपटायचा. मग तसेच दुसऱ्याने करायचे. सुरुवात बंगाली करतो. तो खुदीराम बोसचे नाव घेतो व पंजाब्याच्या दाढीतील एक केस उपटतो. पंजाबी भगतसिंगाचे नाव घेतो व बंगाल्याच्या दाढीतील एक केस उपटतो. असे चालूच राहते आणि एका क्षणी पंजाब्याच्या लक्षात येते की त्याच्याकडील नावे संपत आली आहेत आणि बंगाली तर जोरात असतो. शेवटी पंजाब्याला जालियनवाला बागेतील शेकडो हुतात्म्यांचे स्मरण होते आणि तो 'जालियनवाला बाग' असे ओरडून बंगाल्याची दाढीच ओढून काढतो. आता असे साम्यस्थळ पाश्चात्त्य देशामध्ये सहजासहजी सापडणे शक्य नाही.

एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वातील वैशिष्ट्यं बरोबर पकडून, रेखाटनात त्याचाच अतिरेक दाखवून, ओळख पटेल असं साम्य साधायचं अशी एकूण व्यंगचित्रकाराची पद्धत असते. हास्यकाला सुयोग्य व्यंगचित्रकाराची साथ असेल तर त्यांना अधिक दाद मिळते. फारसे भाष्य न करताही थोडक्या शब्दांत हेतू साध्य करता येतो. व्यंगचित्रातून थोडक्या शब्दांत अत्यंत सूचक विनोद कसा साध्य करता येतो, याचे मासलेवाईक उदाहरण द्यायचे झाल्यास बऱ्याच वर्षांपूर्वी ऐकलेला एक विनोद सांगतो–

एक कर्मचारी ऑफिसचे काम संपवून संध्याकाळी दमूनभागून आपल्या घरी येतो आणि ब्रीफकेस बाजूला ठेवून फॅन लावून 'हुश्श' करीत सोफ्यावर घाम पुसत बसतो. त्याचा दोन-तीन वर्षांचा मुलगा लगेच त्याच्या मांडीवर जाऊन बसतो. त्या छोट्या मुलाची आई दिवाणखान्याच्या दरवाज्याच्या चौकटीतून डोकावून मुलाला 'बाळ्या' एवढेच म्हणते. बाबा दमून आल्याने लगेच त्यांना त्याने त्रास देऊ नये हा तिचा उद्देश. त्यावर मुलगा म्हणतो, 'आम्ही नाही जा. आम्ही आधी बसलो !'

केवढा सूचक, थोडासा चावट पण हास्यकारक विनोद अतिशय थोडक्या शब्दांत इथे साधला आहे हे पाहण्यासारखं आहे. आचार्य अत्रे यांनी म्हटलं आहे, 'विनोद हा सांगणाऱ्याच्या तोंडापेक्षा ऐकणाऱ्याच्या कानात अधिक खुलतो.' ते अगदी सार्थ आहे. काल्पनिक हास्यके व हास्यकथांचा चुरचुरीतपणा दाखविण्यासाठीच काहींचा येथे उल्लेख केला आहे.

काल्पनिक विनोदांची अनेक संकलने प्रसिद्ध झाली आहेत व होत असतात. थोडी वेगळी वाट धरायची म्हणूनच मी केवळ 'औरस' विनोदांचं संकलन केलं आहे. मधमाशी ज्याप्रमाणे निरनिराळ्या फुलांतून केवळ मध गोळा करून त्याचं पोळं तयार करते, त्याचप्रमाणे अनेक प्रतिभावंतांच्या लिखाण व भाषणांच्या फुलोऱ्यातील हास्यप्रधानरूपी मध गोळा करून त्याचा 'मधुघट' मी आपणापुढे ठेवला आहे. मला आशा आहे ती त्याच्या आस्वादानं आपल्या आनंदात भर पडेल.

आनंद घोरपडे

२१ 'उमंग', धवलगिरी हौसिंग सोसायटी,
मार्केटयार्ड लगत, बिबवेवाडी,
पुणे ४११०३७.

१

पु. ल. देशपांडे आणि विनोद

नो मोर प्लिज !

एका नवोदित चित्रकाराने आपली मोराची चित्रे पु. ल. देशपांडे यांनी पाहावीत असा आग्रह धरला आणि ती चित्रं पाहण्यासाठी पु. ल. व त्यांचे मित्र श्री. आप्पासाहेब जाधव यांना बोलावले. प्रख्यात चित्रकार श्री. रवींद्र मिस्त्री यांच्या घरी ती चित्रे मांडून ठेवली होती. आपल्या एकूण तीनशे-एक मोरांच्या चित्रांपैकी आपण फक्त ८०-९० च चित्रे आणली आहेत, अशी माहितीही चित्रकाराने त्यांना तेथे दिली. झाडावरचा मोर, पिसारा पसरलेला मोर, मागे वळून पाहणारा, उंच मान केलेला मोर असे अनेक प्रकार त्यात होते. जेमतेम ५०-५५ चित्रे पाहून झाल्यावर कंटाळून भाईंनी खुर्ची गाठली व म्हणाले, 'आता नो मोर (No more) !'

■

अतिरेकी

पु. ल. ऊर्फ भाई आजारी असताना एक बाई आल्या होत्या. भाईंनी 'रेकी'ची ट्रीटमेंट घ्यावी असा त्यांचा आग्रह होता. भाईंनी लवकर बरं व्हावं म्हणून त्यांचे अनेक चाहते त्यांना भेटून काही उपचार सुचवीत असत. त्याप्रमाणेच या बाईही ॲपॉईंटमेंट घेऊन घरी येऊन बराच वेळ 'रेकी'वर बोलत बसल्या. शेवटी भाईंनी सर्व ऐकून घेतले. बऱ्याच वेळाने त्या जशा दरवाज्याबाहेर पडल्या तसे भाईंनी सुनीताताईंना हाक मारून बोलावलं आणि म्हणाले, 'ही कसली रेकी, ही तर अति-रेकी !'

■

भिडेखातर

पु. ल. देशपांडे व त्यांच्या पत्नी सुनीताताई एकदा सोलापूरच्या 'श्रीराम पुजारी प्रतिष्ठान'च्या समारंभासाठी गेले होते. त्यावेळी ते प्रतिष्ठानचे अध्यक्ष होते. मोठा दोन तासांचा समारंभ होता. समुदाय खूप जमला होता. मधुमेहाच्या आजारामुळे पुलंना एकतर एके ठिकाणी दीर्घकाळ बसणे कठीण होते. त्यात आणखी अडचण म्हणजे त्या पूर्ण आवारात केवळ एकच टॉयलेट होते. तेथे मोठी रांग लागलेली असे. पु. ल. त्या रांगेतच उभे राहिले. ते पाहून तेथील डॉ. भिडे पुढे झाले व त्यांची अडचण लक्षात घेऊन पुलंना घेऊन समोर निघाले. गर्दीतून वाट काढताना ते लोकांना वारंवार सांगत होते, 'पुलंना पुढे जाऊ द्या.' शेवटी त्यांना वाट मिळाली आणि ते टॉयलेटपर्यंत पोहोचले. जाता-जाता पु. ल. म्हणाले, 'अखेर 'भिडे'खातर लोकांनी वाट दिली !'

शाब्दिक कोटी हे पु. ल. देशपांडे यांच्या विनोदाचे खास अंग; पण अतिशयोक्ती, अजब तर्कशास्त्र, विनोदी अंगाने वर्णन करण्याची शैली, विनोदी प्रसंगनिर्मिती या व अशा इतर माध्यमांतूनही त्यांनी हास्यफुलोरा निर्माण केला आहे.

■

व्यासपीठ

पंडित सी. आर. व्यास हे शरद तळवलकरांच्या पत्नीचे गुरू. त्यांच्या एकसष्टीच्या कार्यक्रमासाठी शरदराव गेले होते. अध्यक्ष होते पु. ल. आपले अध्यक्षीय भाषण करताना पु. ल. म्हणाले, 'आजवर अनेक व्यासपीठांवरून मी बोललोय पण हे 'व्यास'पीठ बोलायला जरा कठीणच !

या त्यांच्या कोटीला प्रचंड दाद मिळाली.

■

मुलगी आणि चटका

एकदा पुलं एके ठिकाणी गेले असताना 'आपण काय घेणार?' अशी त्यांना विचारणा करण्यात आली.

'काही नको,' भाई म्हणाले.

'गरम दूध तरी घ्या,' असे म्हणत त्या घरातल्या मुलीने एका ग्लासातून गरम दूध आणून त्यांना दिले. त्या ग्लासाला हात लावताच भाईंचा हात

भाजला, तेव्हा ते पटकन म्हणाले, 'प्रथम भेटीतच चटका लावून जाणारी ही मुलगी आहे !'

■

बाबा वाक्यम्. . . !

बाबा आढाव यांच्या एका सभेत बोलताना पु. ल. म्हणाले, 'प्रत्येक गोष्ट तपासून घेतली पाहिजे. अभ्यासून, पारखून घेतली पाहिजे. 'बाबा वाक्यं प्रमाणम्' हे मला मान्य नाही. मग ते बाबासाहेब आंबेडकर असोत किंवा बाबा आढाव असोत !'

■

'वादी' की बुद्धिवादी

तासगाव येथील 'आर्टस् अँड कॉमर्स' कॉलेजने स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. त्या कार्यक्रमात परिश्रमाविषयी आपले विचार मांडताना पु. ल. म्हणाले, 'परिश्रमाला डोकं लागत नाही, म्हणून कुणी सांगितलं? प्रत्येक गोष्टीला डोकं लागतं. रस्त्यातून चालता चालता चपलेचा अंगठा तुटला तर त्यावेळी पुण्यातला अगदी उच्च विद्वान भेटून काय उपयोग होणार? तिथे ज्याला वहाण दुरुस्त करता येते, ज्याला वादी लावता येते असा चांभारच पाहिजे. मला तेथे बुद्धिवादी नको.'

■

नाग आणि भुजंग

पुण्याच्या 'संभाजी पार्क' मध्ये सवाई गंधर्वांच्या पुतळ्याची स्थापना करण्यात आली तेव्हाचा एक प्रसंग.

कार्यक्रमानंतर काही निवडक लोकांना सवाई गंधर्वांचे जावई डॉ. नानासाहेब देशपांडे यांच्या 'आलापिनी' बंगल्यावर जेवण होते. पु. ल., महापौर या नात्यानं ना. ग. गोरे, आयुक्त भुजंगराव कुलकर्णी, पं. भीमसेन जोशी, फिरोज दस्तूर, डॉ. गंगूबाई हनगल वगैरे मंडळी जेवणास हजर होती. जेवणाच्या टेबलावर ना. ग. गोरे, पु. ल. भुजंगराव कुलकर्णी सोबत बसले होते. जेवणाचा बेत उत्तम होता. सगळे लोक आता जेवावयास सुरुवात करणार, इतक्यात पु. ल. डॉ. नानासाहेबांना म्हणाले, 'नाना, तुम्ही जेवणाचा बेत फारच उत्तम केला आहे. पण मला आता जेवण जाईल की नाही याची

शंका आहे.' डॉ. नानासाहेबांनी त्यांना विचारले, 'का? पोट बरोबर नाही का भाई?' तेव्हा पु. ल. म्हणाले, 'तसं काही नाही नाना, पण माझ्या एका बाजूला नाग व दुसऱ्या बाजूला भुजंग असताना मला जेवण कसं जाईल?'

■

'मोशन' पिक्चर

एकदा पु. ल. एक मराठी चित्रपट बघायला गेले होते. त्या चित्रपटात एक विनोदी दृश्य होतं. कुणीतरी कुणाची तरी फजिती करण्यासाठी जेवणात रेचक टाकलेलं असतं आणि मग जो उठतो तो टमरेल घेऊन नदीकडे धावतो. अशी धांदल सुरू होते. चित्रपट संपल्यावर निर्माता व दिग्दर्शक मोठ्या रुबाबात पुलंपाशी आले व त्यांनी विचारले, 'काय भाई, कसं वाटलं पिक्चर?' भाई म्हणाले, 'वा ! सुरेख ! ! मराठीतील अगदी पहिला 'मोशन' पिक्चर वाटतो ! !'

■

डॉक्टर आणि बिल

एकदा एक प्राध्यापक पुलंना आपल्या प्रकृतीविषयी सांगत होते, 'माझी तब्येत अगदी ठणठणीत आहे. मी भरपूर काम करतो आणि आहारही तसाच घेतो. त्यामुळे रोग माझ्याकडे फिरकत नाही.' पुढे ते म्हणाले, 'आणि बरं का भाई, कधी डॉक्टरांना एका पैशाचंही बिल दिल्याचे मला स्मरत नाही.' त्यावर मिश्किलपणे भाई म्हणाले, 'हो, डॉक्टरही असंच म्हणत होते.'

■

थंडी आणि दात

पु. ल. हे मो. ग. रांगणेकरांच्या नाटक कंपनीत होते त्यावेळची गोष्ट. मुक्काम नागपूर. थंडी कडाक्याची. जो-तो सकाळी उठल्यावर म्हणायचा, 'बाप रे, काय थंडी !' तबलजी मामा म्हणाले, 'रात्रीसारखी थंडी कधीच पडली नसेल. नुसते दातावर दात आपटत होते.' त्यावर पु. ल. म्हणाले, 'मामा, तुम्ही रात्री वाटीत काढून ठेवलेल्या दातांच्या कवळ्यासुद्धा एकमेकांवर इतक्या आपटत होत्या, की त्या आवाजानेच मी जागा झालो !'

■

खोटं ! फक्त इंग्रजीतच ! !

साहित्यिकांच्या एका बैठकीत एका कवीने अगदी सुमार अशी कविता म्हणून दाखविली. अर्थातच त्याला फारशी दाद मिळाली नाही. या बैठकीला उपस्थित असलेल्या पुलंना त्याने विचारले, 'कशी काय वाटली माझी कविता?'

'व्हेरी गुड पोएम.' पु. ल. लगेच म्हणाले.

दुसऱ्या एका साहित्यिकाने हरकत घेतली, 'कविता मराठीतून आहे, तुम्ही मराठीतच बोलायला हवं.'

'पण माझी एक अडचण आहे.' पु. ल. गंभीरपणे म्हणाले.

'अडचण? कसली अडचण?' त्या साहित्यिकाने आश्चर्याने विचारले.

'मला फक्त इंग्रजीतूनच खोटं बोलायची सवय आहे.' पु. ल. म्हणाले.

■

कविता. . . एक आश्चर्य !

एका कवी संमेलनात एका कवीने आपल्या कविता सादर केल्या. त्याचं काव्यवाचन झाल्यावर पु. ल. त्याला म्हणाले, 'तुमच्या कविता ऐकून मला खूपच आश्चर्य वाटलं.'

'म्हणजे मी कविता कशा करतो याचंच ना?' कवी महोदयांनी प्रश्न केला.

'नाही, कशाला लिहिता याचं !' पु. ल. पुटपुटत म्हणाले.

■

शेवट आणि 'अंतर'

एका अतिउत्साही नवोदित लेखकाने पुलंना आपली कादंबरी अभिप्रायासाठी म्हणून दिली. काही दिवस लोटल्यावर त्याने अभिप्राय विचारला. तेव्हा पु. ल. म्हणाले, 'कादंबरी तशी छान आहे, पण शेवट जरासा खटकतो.'

'खटकतो? का बरं?' नवोदित लेखकाने आश्चर्य व्यक्त केले.

'कारण कादंबरीचा अंत तिच्या आरंभापासून फारच दूर अंतरावर आहे !' पु. ल. गंभीर चेहरा करून म्हणाले.

■

किल्ला आणि योजना

एकदा उत्तर भारतातील एका कार्यक्रमासाठी पुलंना विशेष निमंत्रण दिले होते. संयोजकाने त्यांना तेथील एक किल्ला पाहण्यासाठी खास आग्रहाने नेले. किल्ला पाहत असताना किल्ल्याविषयी त्यांना तो बरीच माहिती देत होता– 'हा किल्ला उभारायला बरीच वर्षे लागली. शेकडो वर्षं त्याचं बांधकाम होत राहिलं.' त्यावर पुलंनी तात्काळ प्रतिक्रिया दिली, 'असं का? मग ही नक्कीच एखादी सार्वजनिक क्षेत्रातील योजना असावी.'

■

. . .रिटायर होतोय'

'आई रिटायर होतेय' या श्री. पाटोळे यांच्या नाटकाच्या सातशेव्या प्रयोगाला पुलं आणि सुनीताताई दोघंही आले होते. शेवटपर्यंत दोघांनी नाटक पाहिलं. मध्यंतरात आत जाऊन कौतुकही केलं. नंतर नाटकाचे लेखक, दिग्दर्शक, कलाकार वगैरेंनी मिळून पुलंना आभारदर्शक पत्र लिहिले. त्या पत्रास उत्तर देताना पुलंनी 'तुमचं नाटक पाहून भारावून गेलो' वगैरे थोडक्यात लिहून शेवटी लिहिलं, 'जास्त काही लिहीत नाही. कारण माझ्या अक्षरावरून तुमच्या लक्षात आलंच असेल की, आता भाई रिटायर होतोय !'

■

पुलिशन आणि सिडियस

एकदा रिझर्व्ह बँकेचे त्यावेळचे गव्हर्नर श्री. सी. डी. देशमुख यांनी पुलंना घरी बोलावून मेजवानी दिली. जेवण आटोपल्यावर पु. ल. जेव्हा जायला निघाले तेव्हा सी. डी. देशमुख यांना विनोद करण्याची लहर आली. त्यांनी पुलंना विचारले, 'काय मग? व्हॉट इज युवर नेक्स्ट पुलिशन?' सी. डीं. नी पुलंच्या नावाचा आधार घेऊन केलेल्या विनोदाला पुलं नीही त्यांच्याच भाषेत हजरजबाबीपणे उत्तर दिले, 'नथिंग सिडियस !' आणि दोघेही मनसोक्त हसले.

■

'सरळ' माणूस

प्रसिद्ध हास्य अभिनेते श्री. शरद तळवलकर त्यांच्या सुरुवातीच्या काळात एकदा आपले मित्र श्री. वसंत सबनीस यांच्याकडे गेले होते. पु. ल. तिथे

आधीच येऊन बसले होते. सबनीसांनी पुलंची शरद तळवलकरांशी ओळख करून दिली, 'हा माझा मित्र शरद तळवलकर.'

'हो का? अरे व्वा ! चांगला मनुष्य दिसतोय, नव्हे चांगलाच असणार.' इति पु.ल.

वसंत सबनीस बुचकळ्यात पडले व पुलंना म्हणाले, 'हे कशावरून म्हणतोस तू?'

'अरे, म्हणजे काय? याच्या नावावरूनच कळतंय ते. नावात एकही काना, मात्रा, वेलांटी, उकार नाही, म्हणजे हा सरळच असणार !' पुलंचा खुलासा.

■

गडकरी आणि किल्लेदार

पुलंच्या घरी एकदा श्री. शरद तळवलकर व प्रसिद्ध गायक श्री. वसंतराव देशपांडे गप्पा मारत बसले होते. गप्पा रंगल्या असताना दारावरची बेल वाजली. सुनीताताईंनी दार उघडले. दारातला माणूस थेट आत आला व म्हणाला, 'नागपूरहून आलोय. माझं तुमच्याकडे काम आहे.' खरं तर पुलंना गप्पा रंगल्या असताना त्रयस्थ माणसाशी बोलण्याची इच्छा नव्हती; पण तरीही त्यांनी विचारलं, 'काय काम आहे?'

तो म्हणाला, 'गडकऱ्यांचं 'एकच प्याला' हे नाटक एक तृतीयांश चूक आहे. ते नाटक मी सुधारून आणलंय.'

त्याला चटकन कटवायचं म्हणून पु. ल. म्हणाले, 'ठीक आहे. तुम्ही त्या वह्या ठेवा इथं. मी वाचतो आणि तुम्हांला कळवतो.'

पण तो माणूस निघायचं नाव काढेना. 'तुम्ही आत्ताच ते पाहा,' असा हट्ट धरून तो बसला. पुलंनी तेथे बसलेल्या शरदराव व वसंतरावांकडे पाहिलं. जणू त्यांना त्यातून सुचवायचं होतं, 'बघा, याला आता कसा कटवतो ते !'

त्यांनी वही उचलली व मोठ्यानं वाचायला सुरुवात केली–

'एकच प्याला'. लेखक : राम गणेश गडकरी. इथं पु. ल. थांबले व त्यांनी त्या माणसास विचारले, 'कुठं तुम्ही एक तृतियांश नाटक बदललंय?'

समोरचा माणूस म्हणाला, 'पुढं वाचा ना?'

'अहो, पुढं काय वाचा? हे पाहा, राम गणेश गडकरी हे कसं काय? एक तृतीयांश सुधारायचं तर राम गणेश किल्लेदार असं पाहिजे !'

■

मूर्तिमंत घोटाळा

एकदा पुलंची मुलाखत घेताना श्री. मुकुंद टांकसाळे भाईंना म्हणाले की, 'जब्बारच्या प्रयोगातील गाण्यांमध्ये यतिभंग होतात. त्यावर भाई म्हणाले की, 'पूर्वीच्या नाट्यगीतांतही सर्रास हे प्रकार व्हायचे आणि मग त्यांनी त्याबद्दलचे अनेक दाखले दिले. त्यातील एक म्हणजे 'शारदा'तलं 'मूर्तिमंत भीती उभी'. त्यातील 'दाखवावयासी मला तात नेत त्याकडे' या पंक्तीकडे लक्ष वेधून पु. ल. श्री. टांकसाळे यांना म्हणाले की, 'शारदेत काम करणारे नट त्या काळी ही पंक्ती 'दाखवाया सीमला तात नेत त्याकडे' अशी म्हणून प्रचंड घोटाळा करीत.'

पुलंची 'स्वीट हार्ट'

पुलंना 'पार्किन्सन' रोगाचे दुखणे होते. परदेशात असताना त्यावर उपचारार्थ त्यांनी ऑपरेशन केले होते. ऑपरेशन नंतर श्री. म. का. परुंडेकर त्यांना भेटावयास गेले होते; तेव्हा सुनीताबाईंनी परुंडेकरांना ऑपरेशन नंतरही पुलंची विनोदबुद्धी कशी जागृत होती हे दर्शवणारा किस्सा सांगितला तो असा–

इस्पितळात भाईंची काळजी घेणारी एक मुख्य नर्स होती. पु. ल. हे भारतातील नामांकित लेखक आहेत हे तिला माहीत होतं. त्यावरून तिने असंही गृहीत धरलं होतं की, ते मोठ्या आलिशान बंगल्यात राहत असावेत.

आपला आवाज कंठातून नीटसा फुटत नसल्याची तक्रार पुलंनी त्या नर्सबाईकडे केली. त्यावर नर्सबाईंनी सल्ला दिला, 'मि. देशपांडे, तुम्ही तुमच्या बंगल्याच्या पुढच्या दरवाज्यात उभे राहा आणि तुमच्या मिसेसना तुमच्या बंगल्यामागे जे लॉन असेल तिथे उभे राहण्यास सांगा आणि मग जोरजोरात हाका मारा 'माय स्वीट हार्ट, माय डियरऽऽ' आपोआप तुमचा आवाज मोकळा होईल.'

त्यावर भाई त्वरित उत्तरले, 'अहो, पण ते ऐकून माझी शेजारीणच धावत आली तर. . . !

त्या नर्सला भारतातील त्या लेखकाच्या विनोदबुद्धीची चांगली झलक पाहायला मिळाली. खळखळून हसून तिने दाद दिली.

पु. ल. आणि 'पर-स्त्री' योग

भाईंचा जन्म ८ नोव्हेंबरचा. 'केसरी' या वर्तमानपत्रात ८ नोव्हेंबर रोजी जन्मलेल्या व्यक्तींचे भविष्य दिले होते. त्यात लिहिले होते, 'तुमच्या आयुष्यात एक स्त्री येणार आहे.' श्री. पारुंडेकर यांनी भाईंच्या ६० व्या वाढदिवशी त्यांना शुभेच्छा पाठविताना पत्राबरोबर ते भविष्यही गंमत म्हणून कापून पाठविले. भाईंनी त्या 'पत्राला' जे उत्तर पाठविले, त्यात त्यांनी मिश्किलपणे लिहिले, 'भविष्य खरं होण्याची उत्सुकतेने वाट पाहत आहे. जॅकलिन केनेडी तर नसेल?'

■

गणपती वाहन

'गुळाचा गणपती' हा पुलंनी निर्मिलेला चित्रपट. तो प्रदर्शित झाल्यानंतरचा एक गमतीशीर किस्सा.

एक अत्यंत आगाऊ गृहस्थ त्यांच्या निवासस्थानी भेटावयास आले. भाई तेव्हा एका झोपाळ्यावर बसले होते. ह्या गृहस्थांना त्यांच्यावर विनोद करण्याची लहर आली. ते म्हणाले, 'काय, गुळाचा गणपती झोपाळ्यावर कसा काय?' ह्यावर भाई लगेच म्हणाले, 'वाहनाचीच वाट बघत होतो !'

■

मॉडेल पु. ल.

मुंबईतील विले पार्ले येथील लोकमान्य सेवा संघाने 'पु. ल. गौरव दर्शन' म्हणून एक कायम स्वरूपी दालन उभारले आहे. तिथे पुलंच्या एका अर्धपुतळ्याचीही स्थापना केली आहे. तो तयार करण्यासाठी सुप्रसिद्ध शिल्पकार शर्वरी राय चौधरी यांना सीटिंग दिल्यावर पु. ल. म्हणाले, 'वा ! आता आम्ही मॉडेल झालो !'

■

रोखठोक पु. ल.

आपल्या शब्दांमुळे कोणाचेही मन दुखावले जाऊ नये याची भाई नेहमीच काळजी घेत. त्यांच्या विनोदाची जातकुळीही निर्विष व अहिंसकच; पण एकदा १९४२/४३ च्या सुमारास 'अभिरुची' या दर्जेदार मासिकात

श्री. उमाकांत ठोमरे यांनी साहित्याच्या प्रांगणात नव्यानं उदय झालेल्या, काही उल्लेखनीय कवींवर एक लेख लिहिला. त्या लेखाची त्यावेळी खूप चर्चा झाली. भाईंनाही तो लेख खूप आवडला. पण ज्या ग. दि. माडगूळकरांच्या काव्याचे भाई हे कट्टर चाहते होते, त्यांचा उल्लेख मात्र त्या लेखात नव्हता. हे भाईंना खटकले म्हणून त्यांनी 'अभिरुची'ला पत्र लिहून आपली नाराजी कळविली.

'अभिरुची'त भाईंचं पत्र प्रसिद्ध झालं. त्यावर ठोमरेंनी पुन्हा प्रतिक्रिया व्यक्त केली ती डिवचणारी होती. आपल्या पत्रात त्यांनी 'गदिमां'चा विसर पडला अथवा त्यांचे नाव राहून गेले असा सूर न लावता, 'कोण हे गदिमा?' असा कुत्सित प्रश्न विचारला. त्याला भाईंनी आपल्या खास शैलीत समर्पक उत्तर दिले, 'बरोबर आहे. तुम्हांला गदिमा माहीत नसणारच. माझ्या घरी दूध घालणाऱ्या भैय्यालाही राम गणेश गडकरी कोण होते हे माहीत नाही.'

■

लाडू आणि कुरकुर

पुलंच्या गणगोतातील श्रीमती सुधा देसाई पुलंना 'भाईकाका' म्हणत. भाईकाकांच्या हजरजबाबीपणाचा अनुभव त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकालाच आला आहे, असे आपल्या एका लेखात नमूद करून त्यांनी एक आठवण सांगितली आहे ती अशी–

भाईकाकांना चुर्मे लाडू खूप आवडतात हे माहीत असल्याने सुधा देसाईंनी खास त्यांच्यासाठी कडक कुरकुरीत चुर्मे लाडू तयार केले आणि प्रेमाने त्यांना पाठवले.

त्याची पोच देताना भाईंनी लिहिले, 'तुझे माझ्या आवडीचे कडक, कुरकुरीत चुर्मे लाडू खाताना माझ्या तोंडाचा जेवढा कुरकुर आवाज झाला नसेल त्यापेक्षा जास्त कुरकुर सुनीताने ते लाडू संपवल्याबद्दल केली.'

■

पु. ल. आणि 'हवाई गंधर्व'

पंडित मल्लिकार्जुन मन्सूर आणि भाईंचं एक अतूट नातं होतं. पुढे पुढे भाई त्यांच्या व्यापात, तर मल्लिकार्जुनही वारंवार कार्यक्रमाच्या निमित्ताने विमानाने ठिकठिकाणी दौऱ्यावर जात असत. स्वाभाविकच दोघांच्या भेटी फारच

कमी होऊ लागल्या.

या पार्श्वभूमीवर मल्लिकार्जुन मन्सूर यांच्या वाढत्या विमानवाऱ्यांकडे निर्देश करत पु. ल. गमतीने त्यांचा 'हवाई गंधर्व' म्हणून उल्लेख करू लागले.

■

'हात नसलेले' पु. ल.

पुलंनी शब्दांतून अनेकांची व्यंगचित्रे रेखाटली; पण या सर्वगुणसंपन्न लेखकाने स्वत:चे व्यंगचित्र चितारण्याचाही प्रयत्न केला होता.

त्याचं असं झालं की, भाईंचे एक चाहते श्री. सुनील अणावकर हे अमेरिकेत स्थायिक होते. त्यांनी पुलंच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकातील काही व्यक्तिरेखांची काल्पनिक व्यंगचित्रे रेखाटून त्यांना पाठवली. निमित्त होते, पुलंना 'साहित्य अकादमी' पुरस्कार मिळाल्याचे.

भाईंनी अणावकरांना त्याची पोच देणारे पत्र लिहिले. त्या पत्रात अखेरीस 'आपला' या शब्दाखाली स्वत:चेच एक व्यंगचित्र रेखाटले. त्या चित्रात त्यांनी स्वत:च्या आकृतीला हात दाखवले नव्हते. चित्राखाली लिहिले होते, 'साधारण असा पु. ल. देशपांडे'. पुढे स्पष्टीकरण दिले होते ते असे : 'चित्रातून देखील मला हात दाखवणे जमत नाही. तुमच्यासारख्या चित्रकारांपुढे चित्र काढून केले तेवढेच अवलक्षण पुरे !'

■

पी. एल. आणि एल. पी.

श्री. भास्कर पंडित हे एके काळी एकांकिकेच्या क्षेत्रात आघाडीचे दिग्दर्शक होते. ते पुलंचे खूप विनोदी किस्से सांगत असत. हे नेहमी ऐकणारा त्यांचा एक विनोदी मित्र श्री. सुरेश रोकडे एकदा म्हणाला, 'भास्करने आजवर पी. एल. चे इतके किस्से ऐकवलेत की त्याची एल. पी. (रेकॉर्ड) झाली असती.

■

पुलं आणि हास्यकविता - १

पु. ल. खूप काही होते. विचारवंत, समाजचिंतक, साहित्यिक, विनोदकार, नाटककार, चित्रपट लेखक, अभिनेते, दिग्दर्शक, संगीतकार, वक्ता असे अष्टपैलू प्रतिभावंत होते. त्यांनी काही हास्यकविताही केल्या होत्या. त्यातील एक अशी होती–

'खुदकन हसू'चे पैसे आठ
'खो खो खो' चे एकशेसाठ
हसवायचा करतो धंदा
कुणी निंदा कुणी वंदा

■

पु. ल. आणि हास्यकविता - २

बहुतेक सर्वसामान्य कवींना एखादी कविता त्यांनी केल्यावर ती कोणाला तरी वाचून दाखविण्याची उबळ येतच असते. त्यामुळे त्यांना टाळण्याकडेच अनेकांचा कल असतो. त्या दृष्टीने विमा एजंट व कवी एकाच पंक्तीत बसतात. मग अशा कवींना हक्काचा श्रोता मिळतो ती त्याची पत्नी. पण त्या सुद्धा अशा आपल्या कविवर्य नवरोबांच्या कविता ऐकण्यास कशा नाखूष असतात व त्यामुळे उद्विग्नता दाखवितात. यावर पुलंनी केलेली एक काव्यरचना–

कवी (पत्नीस): ऐकशील का गे माझे
झुळझुळीत गीत?
पत्नी : द्या ते घालते चुलीत
कवी : हाय दैवा ! काय गति ही
अरसिकता किती ही पहा
पत्नी : पेटविते बाड, होईल
बादली भरूनी चहा !

■

पु. ल. आणि हायकू

बहुतेक जुन्या मातब्बर कवींना, मग ते आचार्य अत्रे असोत की पु. ल., त्यांना नवकविता, हायकू अशा काव्य प्रकारांचा उद्वेग होता. म्हणूनच पुलंनी हायकू करणाऱ्या कवींची रेवडी उडविणारे विडंबन काव्य केले ते असे–

एक कोंबडी खुडुक बसली
आता नुसतीच घालते बांग
खुडुक कवी हायकूशिवाय
आणखी काय करील सांग !

■ ■ ■

२

प्रख्यात साहित्यिक आणि विनोद

माडखोलकर वि. अत्रे

ग. त्र्यं. माडखोलकरांनी एकदा राम गणेश गडकऱ्यांवर टीका करताना म्हटले, 'अरुणोदय कधी पाहिलेलाच नसणार, तेव्हा त्यांच्या 'अरुणा'त आत्मानुभव नाही.'

गडकऱ्यांना गुरू मानणारे आचार्य अत्रे यांना ही टीका काही रुचली नाही. त्यांनी त्याबद्दल माडखोलकरांना फटकारताना सवाल केला, 'गडकरी उशिरा उठत हे तुम्हांला काय माहीत? तुम्हांला काय त्यांचे अंथरूण गुंडाळण्याच्या कामावर नेमले होते?'

■

ेव वि. अत्रे

स्वातंत्र्य मिळाल्यावर प्रसिद्ध गांधीवादी काँग्रेस पुढारी कै. श्री. शंकरराव देव यांनी 'आमच्या देशाला सैन्याची जरूरच नाही,' असे वक्तव्य केले. तेव्हा आचार्य अत्रे यांनी स्वत:च्या घणाघाती पद्धतीने प्रतिवाद केला, 'सैन्य नको तर देशाचे संरक्षण करायचे कसे? शत्रूची स्वारी जर देशावर झाली तर देशाभोवती काय तुमचा पंचा गुंडाळावयाचा? तो देखील त्यावेळी स्वच्छ मिळायला हवा !'

■

विद्यार्थी अत्रे आणि किस्से

ानसे आणि ढवळीकर

आचार्य अत्रे यांच्या विद्यार्थिजीवनात घडलेला एक किस्सा सांगितला जातो तो असा–

अत्रे फर्ग्युसन कॉलेजात शिकत होते. प्रा. पानसे त्यांचे अध्यापक होते. त्यांचा स्वभाव मोठा विनोदी होता. त्यांच्या वर्गात एक ढवळीकर नावाचा विद्यार्थी होता. त्याच्या काळ्या वर्णावर कोटी करण्याचा मोह त्यांना आवरत नसे. विशेषत: 'मालती-माधव' नाटक शिकवताना ते वारंवार म्हणायचे, 'कृष्णोऽपि धवलीकर' (जो रंगाने काळा असला तरी नावाने गोरा आहे).

हे ऐकून ऐकून चिडलेल्या ढवळीकरने पानसेंवर कोटी साधली. तो म्हणाला, 'अहो, मी 'ढवळीकर' असेन नावाने; पण पानसे म्हणजे कोण– 'पानं कृत्वा गटार शेते, इति पानसे' (अर्थात जो दारू पिऊन गटारात झोपतो).

हा किस्सा खरा-खोटा माहीत नाही पण अत्र्यांच्या बेफाट स्वभावाला निश्चितच साजेसा आहे.

■

प्राध्यापक, तरुणी आणि गुलाब

चेष्टा-मस्करी काही वेळा चावटपणाकडेही झुकते; पण त्यातही काही प्रतिभेची झलक असली, त्याला काही दर्जा असला तर त्याचेही कौतुकच होते. आचार्य अत्र्यांनी या स्वरूपाचा सांगितलेला एक किस्सा आहे तो असा–

कॉलेज जीवनातील पहिलेच वर्ष. वर्ग नवा आणि त्या कॉलेजात नव्याने रुजू झालेला प्राध्यापकही नवे. प्राध्यापक तरुण होते आणि दिसायलाही देखणे. त्यामुळे विशेषत: विद्यार्थिनींवर त्यांची चांगलीच छाप पडत होती. ते विवाहित आहेत वा कसे इत्यादी उत्सुकताही विद्यार्थिनींमध्ये जरा जास्तच.

एके दिवशी त्यांच्यावर भाळलेल्या एका विद्यार्थिनीने न राहवून एक गोष्ट केली. प्राध्यापक वर्गावर येण्याआधी तिने त्यांच्या टेबलावर काही गुलाबाची फुलं ठेवली. प्राध्यापक वर्गावर आल्यावर त्यांनी विचारलं, 'ही फुलं कुणी आणली?'

'सर, ही फुलं मी तुमच्या पत्नीसाठी आणली.' धिटाईने त्या मुलीने उठून सांगितले. तिचा हेतू हा होता की त्यावर प्राध्यापक काही खुलासा करतील त्यावरून ते विवाहित आहेत की अविवाहित ते कळेल. पण तसे काहीच झाले नाही.

तास संपल्यावर ही गोम लक्षात आलेल्या एका चतुर विद्यार्थ्याच्या मनात थोडा व्रात्यपणा करण्याचा विचार आला. त्याने खडू हाताशी घेतला आणि

फळ्यावर काही काव्यपंक्ती लिहिल्या–

'फुले आणिली प्राध्यापकांच्या
त्या पत्नीसाठी
गेंद गुलाबी गोड गालीचे,
बाले, ते कोणासाठी?'

त्या काव्यपंक्तींमुळे वर्गात हास्याचा कल्लोळ उडाला आणि 'धीट' मुलगी बिचारी गोरीमोरी होऊन गेली.

■

टागोर आणि मैत्रेयीदेवी

एकदा मैत्रेयीदेवींनी रवींद्रनाथ टागोर यांना विचारले, 'श्यामल वर्ण कोणत्या वर्णाला म्हणतात? बंगाली आणि संस्कृतमध्ये 'श्यामला' या शब्दाचे अर्थ भिन्न भिन्न आहेत का?'

रवींद्रनाथ म्हणाले, 'हो. बंगालीत सावळ्या वर्णाला श्यामल वर्ण म्हणतात आणि संस्कृतमध्ये श्यामल शब्दाचा अर्थ होतो सुवर्णासारखा वर्ण.'

असे उत्तर देऊन पुढे मिश्किलपणे ते मैत्रेयीदेवींना म्हणाले, 'आता तू मला एवढं चांगलं खाऊ-पिऊ घातलेस म्हणून तुझ्याशी बोलताना 'श्यामल' शब्द संस्कृतमधल्या अर्थानेच वापरला पाहिजे- भले तो बरोबर नसो !'

■

वरेरकर आणि उचकी

अखेरच्या आजारात मामा वरेरकरांना उचकी लागली. काही केल्या थांबेना. तशातही मामांची विनोदबुद्धी जागी होती. भेटायला आलेल्यांना ते म्हणत, 'अरे, वरती जवाहर (जवाहरलाल नेहरू) माझी आठवण काढतोय. त्याचीच ही उचकी !

■

वरेरकर आणि नाटकाचा पिता

मामा वरेरकर यांच्या 'हाच मुलाचा बाप' या नाटकाचे कन्नड भाषेतही रूपांतर झाले होते. त्या कन्नड रूपांतरित नाटकाचा प्रयोग मामा वरेरकर यांच्या उपस्थितीत झाला तेव्हाची गोष्ट. नाटकाच्या सादरकर्त्यांनी वरेरकरांची ओळख करून देताना हिंदीत गमतीने म्हटले, 'यह है नाटक का पिता'

मामांनी त्यावर मिश्किलपणे पुस्ती जोडली, 'लेकिन नाटक की माता यहाँ आयी नहीं है !'

■

बिनीवाले आमि 'एकेबी'

'बोलु कवतिके' या शीर्षकाखाली दर रविवारच्या 'लोकसत्ता' या दैनिकात लेख लिहिणारे श्री. अविनाश बिनीवाले हे बसने एकदा पणजीहून कारवारला चालले होते. त्यांच्या शेजारी बसलेल्या स्त्रीने त्यांना विचारले, 'आर यू जी. एस. बी.?' (तुम्ही गौड सारस्वत ब्राह्मण आहात काय?) तिच्या प्रश्नाचा रोख कळूनही श्री. बिनीवाले यांनी गमतीत तिला उत्तर दिले, 'नो, आय ॲम ए. के. बी.' प्रश्न विचारणाऱ्या बाई गोंधळात पडल्या; ए. के. बी. म्हणजे कोणती जात असावी, असा विचार करू लागली. काय बोलावे हे तिला कळेना. शेवटी बिनीवाले यांनीच खुलासा केला, 'माझे नाव अविनाश कृष्ण बिनीवाले अर्थात ए. के. बी !'

■

अज्ञेय आणि 'आंबा'

विख्यात साहित्यिक श्री. स. हि. वात्सायन ऊर्फ 'अज्ञेय' यांच्या संपादकत्वाखाली 'ज्ञानोदय' या नावाचे एक नियतकालिक प्रकाशित व्हायचे, त्या काळातली गोष्ट.

एकदा एका लेखिकेचे त्यांना पत्र आले की, 'महाशय, मागच्या आठवड्यात माझी एक कथा तुम्ही साभार परत पाठविली. कथा परत आली त्याचं मला दु:ख नाही; पण ही कथा न वाचताच परत केली गेलीय, याचं मला वैषम्य वाटतं. कथा पाठविताना मी मुद्दामहून या कथेच्या हस्तलिखिताची दहा, अकरा, बारा क्रमांकाची पाने डिंकानं चिकटवून ठेवली होती. ती जशीच्या तशीच चिकटलेली आहेत. याचा अर्थ असा होतो की साहित्य न वाचता तसंच परत पाठवून लेखकाला फसवता.'

उत्तरादाखल अज्ञेयजींनी लिहिलं, 'महोदया, एखादा आंबा सुरवातीलाच आंबट लागला तर, सगळा आंबा खाऊन पाहण्यात शहाणपण आहे काय?'

■

त्रिवेदी आणि द्विवेदी

हिंदीतील नवोदित लेखिका श्रीमती क्रांती त्रिवेदी यांनी आपली एक कथा 'कादंबिनी' या नियतकालिकाला पाठविली. कथा स्वीकृत झाली; पण कथेच्या लेखिकेचे नाव चुकून 'क्रांती द्विवेदी' असे छापले गेले.

लेखिकेने 'कादंबिनी'च्या संपादकांना पत्र लिहिले, 'माझं नाव त्रिवेदी ऐवजी द्विवेदी असं छापलं गेलंय. एका वेदाचं नुकसान कोण भरून देणार?'

'कादंबिनी'चे संपादक होते प्रसिद्ध साहित्यिक राजेंद्र अवस्थी. अवस्थीजींनी उत्तर दिले, 'चूक झाली खरी. पुढच्या वेळेस तुमचं नाव चतुर्वेदी असं छापू, म्हणजे नुकसानीची भरपाई होईल !'

■ ■ ■

३

कवी, शायर आणि विनोद

विं. दा. आणि हास्यरस

कवी विं. दा. करंदीकर तसे गंभीर प्रकृतीचे कवी; पण त्यांनीही काही हास्यकविता केल्या आहेत आणि त्याचप्रमाणे बऱ्याच कार्यक्रमांमधूनही त्यांनी आपल्या विनोदी अंगाचे दर्शन घडवले आहे. अशा कवितांचे व किश्श्यांचे काही नमुने आहेत ते असे–

अरब म्हणाला, खुदा असावा एक मला हे पटले
परि बाईलही एक असावी, अजब तत्त्व हे कुठले?

कापडात घ्या खादी तयात जादू वसे
राहतात ना कधी रिकामे या कपड्यांचे खिसे

कामराज योजना सतीने घरात करता जारी
स्थानभ्रष्ट पति करू लागला संघटना शेजारी

■

विं. दा. आणि माधव जूलियन

विं. दा. करंदीकर कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये शिकत होते, तेव्हाची गोष्ट. कविवर्य माधव जूलियन त्या कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. विं. दा. त्यांच्या कवितांचे निस्सीम चाहते होते. त्याच कॉलेजात प्रा. पंगू हे सुद्धा मराठीचे प्राध्यापक होते. इ. स. १९३८-३९ च्या दरम्यान माधव जूलियन यांना त्यांच्या छंदोरचनेबद्दल डी. लिट्. ही पदवी देण्यात आली. या संदर्भात विंदांच्या असे कानावर आले की जूलियन यांना डी. लिट्. मिळू नये, या दुष्ट हेतूने पंगू यांनी काही खटपट केली होती. विंदांना ही गोष्ट रुचली नव्हती.

पुढे कॉलेजात जूलियन यांचा सत्कार-समारंभ आयोजित करण्यात आला

व प्रा. ना. सी. फडके अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी बोलताना विंदांनी ठरवल्याप्रमाणे माधव जूलियन यांची प्रथम खूप स्तुती केली आणि नंतर ते श्री. पंगू यांच्यावर घसरले. ते म्हणाले, 'एखादा वाङ्मय महर्षी कीर्तीचा हिमालय चढत गौरीशंकरापर्यंत पोहोचला तर स्वत:च जे 'पंगू' असतात त्यांना ते बघवत नाही, ते त्यांचा पाय ओढण्याचा प्रयत्न करतात.' प्रा. पंगू यांनाच लक्ष्य करून हा टोला असल्याचे सत्कारसभेस असणाऱ्या श्रोत्यांच्या ताबडतोब लक्षात आले आणि म्हणून त्यांनी श्री. विंदांच्या या वाक्यास मनापासून उत्स्फूर्त दाद दिली. विंदांनी मात्र भोळेपणाचे सोंग घेतले व श्रोत्यांनी इतक्या मोठ्या प्रमाणावर त्यांच्या त्या वाक्यास का दाद दिली, हे जणू आपणास कळलेच नाही असे दाखविण्यासाठी श्रोत्यांनी टाळ्या का दिल्या असे प्रत्यक्ष अध्यक्ष महोदय श्री. ना. सी. फडके यांनाच विचारले. ह्यावर फडके यांनी पुढच्याच रांगेत बसलेल्या प्रा. पंगू यांच्याकडे बोट दाखविले. तेव्हा पुन्हा मोठा हास्यप्रलय झाला. विंदांना प्रा. पंगू यांची पुरती फजितीच करावयाची होती, म्हणून पुन्हा त्यांनी मानभावीपणे खुलासा केला की मी हे वाक्य प्रा. पंगूंना उद्देशून बोललेलो नाही. अर्थात पुन्हा हशा आणि टाळ्यांनी सभागृह दणाणून गेले, हे सांगायला नकोच.

■

विं. दा. व तुकडोजी महाराज

कविवर्य श्री. विं. दा. करंदीकर हे काही काळ अकोला येथे राहत असताना नागपूरला एकदा कवि-संमेलन भरले होते. इतर प्रमुख कवी मंडळींच्या समवेत श्री. विंदांनी त्यात भाग घेतला होता. कवि-संमेलनाचे अध्यक्ष होते श्री. तुकडोजी महाराज. सुरुवातीच्याच आपल्या भाषणात नवकवितेवर टीका करताना त्यांनी शेरा मारला, 'हल्ली नवकविता गवताऐसी उदंड झाली आहे.' विंदांना ही टीका आवडली नाही म्हणून त्यांच्यावर जेव्हा काव्यवाचनाची वेळ आली तेव्हा त्यांनी प्रथमच सांगून टाकले, 'आत्ताच महाराजांनी नवकविता गवताएवढी उदंड झाली आहे असं सांगितलं आहे, तेव्हा मी माझी एक गवताची पेंढी आपल्यासमोर टाकतो.' हे ऐकताच सभेत शांतता पसरली; पण विंदांनी त्यांची ही 'ही जनता अमर आहे' ह्या कवितेचं वाचन करताच, तुकडोजी महाराजांसह सर्व श्रोतृवृंदांनी उत्स्फूर्त दाद दिली.

■

कवी ज. के. उपाध्ये

विदर्भात ज. के. उपाध्ये नावाचे ज्येष्ठ कवी होऊन गेले. चित्रपट दिग्दर्शक राम गबाले यांनी एका मुलाखतीत पत्रकार विजय कुवळेकर यांना त्यांच्याबद्दल सांगितलेला किस्सा मोठा रोचक आहे.

उपाध्ये यांची शब्दांवर व काव्यरचनेवर विलक्षण हुकमत होती. एखाद्या सहज-साध्या वाक्यातूनही ते अर्थपूर्ण रचना क्षणात साकार करायचे. एकदा उपाध्येबुवा मित्रांसोबत घरात बसले होते. उन्हाळ्याचे दिवस होते. बाहेर रस्त्यावरून कोणाची तरी अंत्ययात्रा चालली होती. 'राम बोलो राम' हा घोष होत होता. कुणीतरी म्हणालं, 'बुवा, ऐकताय ना, राम बोलो भाई राम? आता करा समस्यापूर्ती !' बुवांनी क्षणात समस्यापूर्ती केली ती अशी :

जीवन म्हणजे माठ जलाचा
क्षणाक्षणाला झिरपायाचा
त्याचे गार व्हायचे काम
राम बोलो भाई राम !

कवी-मरण

हेच बुवा उपाध्ये गंभीर आजारी असतानाची गोष्ट. प्रकृती अत्यंत क्षीण झालेली. आसन्नमरण अवस्था. तरीही हसरी विनोदी वृत्ती कमी झालेली नव्हती. एक दिवस काही तरुण त्यांना भेटायला आले. बुवा अंथरुणावर पडले होते. प्रकृती इतकी क्षीण झालेली होती की अंगावरचं वस्त्रही सावरता येत नव्हतं. तशाच अवस्थेत बुवा पडून होते. त्यांना भेटायला गेलेल्या मित्रांपैकी एक त्यांचं धोतर सारखं करायचा प्रयत्न करायला लागला, तेव्हा बुवा लगेच म्हणाले, 'अरे, थांब थांब, नंगेसे खुदा भी डरता है । असं ऐकलंय. मी असा राहिलो, तर मला नेण्यापासून थोडा वेळ तरी देव लांब राहील ना?' यानंतर काही तासांतच बुवांनी जगाचा निरोप घेतला. अंतसमयापर्यंत त्यांची हसरी जीवनदृष्टी कायम होती.

गळा आणि 'लिफ्ट'

श्री. विश्वास कणेकर यांनी एक अनौपचारिक मैफल जमवली होती. सुप्रसिद्ध कवी नायगावकरही त्याला सामील होते. गप्पांच्या ओघात नायगावकर यांनी वरच्या पट्टीत गाणाऱ्या गायिकांबद्दल बोलताना म्हटले, 'काळी पाचपर्यंत 'वर' गेलेला एखाद्या गायिकेचा आवाज ऐकला की मला प्रश्न पडतो, हिने गळ्यात 'लिफ्ट' लावलीय की काय? एवढा आवाज वर चढतोच कसा?' त्यावर मैफलीत चांगलाच हशा पिकला.

■

मजाज आणि बिघाड

शायरी बरोबरच अपेयपानासाठी प्रसिद्ध असलेले शायर श्री. 'मजाज' एकदा योगायोगाने धर्मचर्चा चाललेल्या बैठकीत पोहोचले. त्यांच्या येण्याने सगळे आश्चर्याने थक्क झाले. बऱ्याच वेळानंतर भानावर येत एकाने विचारले, 'इकडे कसे काय बुवा तुम्ही?'

'माणूस बिघडायला वेळ लागत नाही जनाब.' मजाज गंभीरपणे म्हणाले.

■

'मुरादाबादी' हिसका

जिगर मुरादाबादी या शायराशी बोलताना एक महाशय खवचटपणे म्हणाले, 'वा ! काय परिणामकारक शेर असतात हो तुमचे ! अहो, काल महिलांच्या एका समारंभात अध्यक्षपदावरून बोलताना तुमचा एक शेर म्हणून दाखविला अन् मार खाताना वाचलो हो कसाबसा !'

'असं? मग नक्कीच त्या शेरमध्ये काहीतरी कमतरता असली पाहिजे, नाहीतर तुम्ही नक्कीच मार खाल्ला असता !' जिगर शांतपणे म्हणाले.

■ ■ ■

४

नाटक, चित्रपट, संगीत आणि विनोद

नाना पाटेकर आणि 'मोबाईल-वेडे'

मुंबईतील माटुंगा येथील 'अक्षर चळवळ' या संस्थेने कर्नाटक संघाच्या मदतीने 'काव्योत्सव २००१ मुंबई' हा कवितांचा उत्सव दहा दिवस साजरा केला. विशेष म्हणजे हा कवितांचा उत्सव असताना त्यास अनेक सिने व नाट्य कलावंतांना आमंत्रण होते. हिंदी सिनेसृष्टीतही नावाजलेले मराठी कलावंत श्री. नाना पाटेकर यांनाही अर्थातच आवर्जून आमंत्रण दिले गेले होते. काव्योत्सवाच्या अखेरच्या सत्रात नाना पाटेकर यांनी जेव्हा स्टेजवर येऊन कार्यक्रमाची सूत्रे हाती घेतली, तेव्हा त्यांच्या खिशातील मोबाईल वाजू लागला. तो काढून बोलण्याआधी नाना पाटेकरांनी उत्स्फूर्त कॉमेंट केली- 'आधी लोक बाईलवेडे होते आता 'मोबाईलवेडे' झालेत आणि मोठाच हशा त्यांनी वसूल केला.

■

रेखा आणि गुरखा

सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री रेखा हिने मध्यंतरी आपल्या संरक्षणासाठी एका गुरख्याची नेमणूक केली होती. त्याला बरोबर घेऊनच ती बाहेर पडायची. ते पाहून चित्रपट अभिनेते श्री. अशोक सराफ यांनी एकदा शेरा मारला, 'बुरखा घेऊन जाणाऱ्या अनेक स्त्रिया मी पाहतो; पण गुरखा घेऊन जाणारी रेखाच फक्त पाहिली.'

■

दादा कोंडके आणि हाफ पँट

ख्यातनाम विनोदी अभिनेते व चित्रपट दिग्दर्शक-निर्माते श्री. दादा कोंडके यांना कोण ओळखत नाही? ते जात्याच स्वभावाने अतिशय विनोदी. त्यांना कोणाचीही खोड काढून फजिती करावयाची लहर यायची. एकदा

एका पत्रकाराने त्यांना विचारले, 'दादा, तुम्ही सिनेमात हाफ पँट का घालता? वाईट दिसतं ते !'

दादांना विनोद करण्याची लहर आली. ते म्हणाले, 'नाही घातली तर किती वाईट दिसेल ! हॅऽऽ, तसा सभ्य माणूस आहे मी. अहो, आजूबाजूला बायाबापड्या असतात !'

तरीही काकुळतीला येऊन पत्रकाराने खुलासा केला, 'नाही नाही, म्हणजे सिनेमात तुम्ही हाफ पँट ऐवजी इतर कपडे.. .'

दादांनी त्याला मध्येच थांबवून त्याची फिरकी घेताना म्हटले, 'असतात ना, वर बंडी असते, आत. . .'

दादांना पुढे बोलू न देता पत्रकाराने घाईघाईने खुलासा केला, 'तसंही नाही. म्हणजे तुम्ही फुल पँट का घालत नाही असं मला विचारायचं होतं हो !'

पुन्हा दादांनी धमाल केली. ते म्हणाले, 'हां हां, असं म्हणताय होय. मी आपला घाबरलो की तुम्ही माझी हाफ पँट पण काढून घेताय की काय?'

■

गब्बर आणि दादा

गब्बर फेम ख्यातनाम चित्रपट अभिनेते श्री. अमजद खान हे एकदा आग्रहाने दादा कोंडके यांच्याबरोबर शिकारीला गेले. त्यांचा नेम काय वर्णावा; पण आपण गोळी घातली की डुक्कर जागीच मरणार असा अमजद खान यांचा दावा होता. डुकराला गोळी मारण्याआधीच त्यांनी फर्मावले, 'डुक्कर लाने कौन जायेगा? इम्रान तैय्यार रहना । सुअर मरतेही उठाकर ले आना ।' 'जणू काही मेलेले डुक्कर पटकन उचललं नाही तर उठून पळून जाणार आहे', अशी त्यावरची दादांची कॉमेंट. काही वेळाने अमजद खानने नेम धरून एका डुकरावर गोळी झाडली. डुक्कर मेलेच असणार अशा फाजिल आत्मविश्वासाने त्याने त्याच्या सहाय्यकाला डुक्कर आणण्यास पिटाळले. गोळीचा नेम चुकल्यामुळे ते डुक्कर वाचले व नंतर पळून गेले, हे प्रत्यक्ष पाहिलेल्या उषा चव्हाणने दादांना विचारले, 'दादा, डुक्कर मेलं नाही ना हो? मग हे लोक काय शोधताहेत?'

दादांनी उत्तर द्यायच्या आधीच अमजदच्या सहाय्यकाने परस्पर उत्तर देऊन टाकले, 'भाईसाबकी गोली ढूँढ रहे है । उनको वह वापस चाहिये ।'

■

कोल्हटकर आणि 'दाल सरोवर'

सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक श्री. दिलीप कोल्हटकर हे कोट्या करण्यातही वाकबगार आहेत. एकदा ते श्री. अशोक पाटोळे यांच्या समवेत 'जिप्सी' हॉटेलमध्ये जेवत असताना वेटरने भातावर जरुरीपेक्षा जास्त दाल-फ्राय सर्व्ह केली, तेव्हा ते झट्दिशी म्हणाले, 'ह्याने तर माझ्या ताटात 'दाल-सरोवर' निर्माण करून ठेवले.'

■

सखाराम बाईंडर आणि बायका

'सखाराम बाईंडर' नाटकावर सरकारने चालविलेल्या खटल्याचे वेळी अनेक विनोद कोर्टात होत. एकदा सरकारतर्फे काम पाहणारे वकील श्री. आर. जे. जोशी सखाराम बद्दल बोलताना चुकून म्हणाले, 'चंपा ही सखारामने आणलेली दुसरी बाई.' लगेच सारंगांचे वकील श्री. अशोक देसाई उठून उभे राहिले व म्हणाले, 'मिलॉर्ड, आमचे विद्वान मित्र सखारामला अंडरएस्टिमेट करतायत- चंपा ही आठवी बाई आहे.'

यावर मोठा हशा झाला. अर्थात 'मलाही नाटकातली दुसरी असंच म्हणायचं होतं,' असे स्पष्टीकरण देऊन ॲडव्होकेट जोशीही मोकळे झाले.

■

तळवलकर आणि 'शेवटचे' पिक्चर

प्रसिद्ध अभिनेते श्री. शरद तळवलकर यांचा विनोदी स्वभाव सर्वांच्या परिचयाचा आहे. त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला त्यावेळची गोष्ट. सर्वांना त्यांच्या तब्येतीची काळजी वाटत होती. त्यांना उपचारासाठी इस्पितळात हलवलं. तेथे त्यांना चाकाच्या खुर्चीत बसवून घेऊन जाताना डॉक्टरांनी शरदरावांना सांगितलं की आता आपण काही फोटो काढायला जायचे आहे. शरदरावांच्या मनावरील ताण हलका करण्याच्या उद्देशाने डॉक्टरांनी सहजच त्यांना विचारले, 'शरदराव, आता नवं पिक्चर कुठलं?' शरदरावांनी शांतपणे उत्तर दिलं, 'बहुधा तुम्ही आता काढताय तेच शेवटचं !'

■

अमोल पालकर आणि मानवत

कोणत्याही क्षेत्रातील दोन नामवंत एकमेकांविषयी फारसे आदराने बोलत नाहीत या आपल्या मुद्द्याच्या पुष्ट्यर्थ थंबी दुराई यांनी एका लेखात एक

मार्मिक उदाहरण दिले होते ते असे–

अमोल पालेकर यांनी मानवत हत्याकांडावर आधारित 'आक्रित' नावाचा चित्रपट निर्मिला. लघुचित्रपट निर्माते खोपकर यांना काही तो चित्रपट फारसा रुचला नाही. चित्रपट पाहिल्यावर ते म्हणाले, ' 'मानवत' नाही बुवा !'

■

हनुमान आणि 'उडता बंदर'

श्री. सुधीर नांदगांवकरांनी सांगितलेला एक मजेदार किस्सा. व्हिडिओ येण्याआधी हिंदी सिनेमांना परदेशात मार्केट होतं, त्या काळातली ही गोष्ट. वाडिया मुव्हिटोन यांनी 'रामभक्त हनुमान' हा पौराणिक चित्रपट काढला आणि मध्यपूर्वेतील सर्व वितरकांना आमंत्रित करून त्यांच्यासाठी त्या चित्रपटाची स्टुडिओत 'ट्रायल' ठेवली.

चित्रपट पाहिल्यावर वितरक म्हणाले, 'हिंदू पुराणातील ही कथा आमच्या मुस्लिम देशांत प्रेक्षकांना रुचणार नाही.' तेव्हा वाडिया म्हणाले, 'ठीक आहे, आपण पुन्हा उद्या 'ट्रायल' ठेवू.

दुसऱ्या दिवशी वाडियांनी 'रामभक्त हनुमान' ऐवजी 'उडता बंदर' असे नाव प्रिंट करून चित्रपटास जोडले. 'उडता बंदर'मुळे लंकेतील हनुमानाने केलेली जाळपोळ हा चित्रपटाचा क्लायमॅक्स वितरकांना फारच आवडला व 'उडता बंदर' मुस्लिम वितरकांनीच विकत घेतला असे नव्हे, तर तो मध्य-पूर्वेतील मुस्लिम देशांत तुफान चालला.

■

अशोक सराफ, लोटा आणि पेले

प्रसिद्ध चित्रपट अभिनेते श्री. अशोक सराफ एकदा 'मेक-अप'ला बसले होते. कुठल्या तरी नाट्यप्रयोगाची तयारी चालली होती. अचानक कपडेपटाच्या माणसाची मेक-अपवाल्याशी कशावरून तरी बाचाबाची सुरू झाली. रागाच्या तिरीमिरीत मेकअपमनने तिथला एक लोटा पायाने उडवला. तेव्हा अशोक सराफ म्हणाले, 'काय रे, लोटा पायाने उडवतोस? स्वत:ला काय 'पेले' समजतोस?'

■

लक्ष्मीकांत बेर्डे आणि 'कायनेटिक'

प्रसिद्ध अभिनेत्री कै. रुही बेर्डे यांनी आपले पती म्हणजे हास्यअभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांच्याकडे 'कायनेटिक-होंडा' दुचाकी घेण्यासाठी हट्ट धरला. तेव्हा लक्ष्मीकांत बेर्डे यांनी गमतीने म्हटले, काय करायचंय कायनेटिक घेऊन? अग, ज्यात 'काय-नाय-ठिक' ती म्हणजे 'कायनेटिक' माहीतीय?'

■

भालजी आणि मि. क्लीन

राजीव गांधी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांच्याविषयी 'लोकमत काय आहे?' असं भालजी पेंढारकर यांनी कांचन घाणेकरांना विचारले. कांचन म्हणाल्या, 'लोक त्यांना मि. क्लीन म्हणतात.' त्यावर भालजी म्हणाले, 'त्याला तसा आजूबाजूच्या लोकांनी राहू दिला पाहिजे. नाहीतर तो कधी 'मलिन' झाला ते त्याचं त्यालाच कळायचं नाही.

■

भालजी, पाया आणि पडणे

एकदा भालजींचे जवळचे स्नेही त्यांना भेटायला आले होते. त्यांना पाठीचा विकार असल्यामुळे ते बेल्ट लावून आले होते. भालजींना वाकून नमस्कार करताना त्यांना खूप त्रास होत होता. त्यांना अवघडल्यासारखं झालं होतं. काही वेळाने ते निघून गेल्यावर भालजी कांचनकडे वळून म्हणाले, 'मधू पाया पडतोय की स्वत:च पडतोय असं मला वाटत होतं !'

■

ललिता पवार आणि केळेवाली

प्रसिद्ध चरित्र अभिनेत्री ललिता पवार एकदा शूटिंगच्या निमित्ताने आर. के. स्टुडिओत गेल्या. काठेवाडी बायका नेसतात तसा आरसे बसविलेला घागरा-चोळीचा वेष त्यांना सुपूर्द करण्यात आला. ते बघून बाई खवळल्याच आणि गाडीत बसून स्टुडिओबाहेर निघाल्या.

चित्रपटाचे पटकथा लेखक श्री. के. ए. आब्बास धावत बाईंच्याकडे आले आणि 'शूटिंग सोडून कुठं निघालात?' असं त्यांनी विचारलं.

बाईंनी शांतपणे सांगितलं, 'मी नारदाचं मंदिर कुठं आहे का ते शोधायला चालले आहे.'

आब्बास म्हणाले, 'बाई, नारदजीका मंदिर होता है' ये तो मैने कभी नहीं देखा ।'

बाईंनी तोच धागा पकडून त्यांना विचारले, 'नाही ना, मग मुंबईत अशी घागरा-चोळी घातलेली केळीवाली तुम्ही पाहिली आहे का?'

■

मधू आपटे आणि 'सवत्स धेनू'

बाबासाहेब नाडगोंडे म्हणजे सुप्रसिद्ध अभिनेत्री बेबी शकुंतला हिचे पती. एकदा सहजच त्यांनी हास्यअभिनेता मधू आपटे याला लग्न करण्याबद्दल छेडलं– 'मि. आपटे, तुम्ही फक्त लग्नाला तयार व्हा. आम्ही तुमची मित्रमंडळी बाकी सर्व काही करू. सगळं आमच्यावर सोपवा.'

मधू आपटे यांनी आपल्या खास (अडखळत्या) शैलीत उत्तर दिलं, 'स्.. स्.. सरकार, तुम्ही मं.. मं... मंडळी सर्व काही करणार, तर मी लग्न तरी क्... क्.. कशाला करू? म् मला स... स सवत्स धेनू नको !'

■

कालेलकर आणि स्वर्ग

चित्रपटनिर्माते श्री. दिनकर जोशी यांचा पटकथा लेखक श्री. मधुसूदन कालेलकर यांच्याशी अर्थातच दाट परिचय. श्री. जोशी हे अगदी सुपारीच्या खांडाचेही व्यसन नसणारे, तर मधुसूदन कालेलकर हे शौकीन गृहस्थ. एकदा जोशी लिखाणाचं काम करण्यासाठी कालेलकरांकडे पोहोचले; पण कालेलकरांकडे मित्रांची बैठक रंगली होती. अशा वेळी जोशींसोबत पटकथेबाबत काम करणे म्हणजे रसभंगच झाला असता. जोशींना परत पाठवण्यासाठी कालेलकर विनोदाचा आश्रय घेत त्यांना म्हणाले, 'माझ्या घरी येण्यास तुम्हांस कोणतीच अडचण नाही. तुम्ही स्वच्छ माणूस म्हणून मेल्यावर स्वर्गात जाणार; पण स्वर्गाच्या प्रवेशद्वाराशीच तुम्हांला रोखण्यात येईल. इंद्रदेव तुम्हांला प्रवेश करू देणार नाही. देव म्हणतील, 'भल्या माणसा, माणसाच्या सुखासाठी, आनंदासाठी मी पृथ्वीवरच धूम्रपान, मद्यपान आणि नृत्यगान अशा अनेक गोष्टी निर्माण केल्या असता, तू त्या अव्हेरल्यास. या गोष्टींपासून मिळणारा आनंद तू उपभोगला नाहीस. स्वर्गात येणाऱ्या प्रत्येक

मर्त्य व्यक्तीला असा अनुभव असला पाहिजे. तो अनुभव तुला नाही, म्हणून मी तुला आज्ञा करतो की तू पृथ्वीवर परत जा. आनंद देणाऱ्या या वस्तूंचा, कलांचा तू मुक्त आनंद घे. यमराज तुझ्या कामगिरीवर नजर ठेवतील. आमच्या मापदंडाप्रमाणे तुझ्या कामगिरीचे मूल्यमापन करतील. त्यांच्या परीक्षेला तू उतरलास तर तुला स्वर्गात पाठवतील. जा तू, पृथ्वीवर परत जा !' '

■

संगीतकार कल्याणजींचे किस्से

संगीतकार कल्याणजी त्यांच्या विनोदी स्वभावासाठी प्रसिद्ध होते. त्यांच्या निधनानंतर सुधीर गाडगीळ यांनी आपल्या एका लेखात त्यांचे काही रोचक किस्से दिले होते ते असे–

लखपती आणि करोडपती

एकदा कल्याणजींच्या पत्नी कल्याणजींच्या मित्राला म्हणाल्या, 'मी या घरात पाऊल टाकलं आणि हे लखपती झाले.'

कल्याणजी पटकन म्हणाले, 'अग, पण त्यापूर्वी मी करोडपती होतो, हे नाही तू त्यांना सांगितलंस.'

■

आजादी और गुलामी

एका मुलाखतीत सुधीर गाडगीळांनी कल्याणजींना 'तुमचं लग्न कधी झालं,' असे विचारले.

कल्याणजी म्हणाले, 'सन उन्नीस्सो सैंतालिस में दो घटना हुई– एक याने देश आजाद हुआ और दुसरी ये, मैं गुलाम हुआ ।'

■

कल्याणजी आणि म्युझिकल भेळपुरी

आपल्याकडच्या चित्रपट संगीताबद्दल बोलताना एकदा संगीतकार कल्याणजी गमतीने म्हणाले, 'फिल्म-म्युझिक म्हणजे एक टेस्टी भेळपुरीच असते– अर्थात निरनिराळ्या रागांची !'

■ ■ ■

५

राजकारणी आणि विनोद

बापूजी आणि बॉलडान्स

महात्मा गांधीजी जेवढे गंभीर होते तेवढेच ते विनोदी पण होते. लंडनमध्ये असताना बापूजी एका पार्टीला गेले होते. तेथील सभ्यतेनुसार पार्टी झाल्यावर स्त्री-पुरुष जोडप्यांचा नाच सुरू झाला. बापू मात्र एका जागी बसून हे सर्व पाहत होते.

'आपणही एक जोडीदार निवडा आणि आमच्यासारखे नाचू लागा,' एका इंग्रजाने बापूंना हटकले.

त्यावर बापूजी शांतपणे उद्‌गारले, 'माझा जोडीदार तर सदैव माझ्या सोबतच असतो !' आणि आपली काठी त्यांनी उचलून दाखवली. ती काठी घेऊन बापू नाचू लागले.

■

बॅ. गाडगीळ आणि 'गवळण'

बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ यांचे मित्र आणि फॅमिली डॉक्टर एन. ए. गाडगीळ यांनी सांगितलेला एक किस्सा–

इ. स. १९८० च्या दरम्यान बॅ. गाडगीळ यांच्यावर 'किडनी स्टोन'च्या उपचारार्थ शस्त्रक्रिया झाली. शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांनी त्यांना कॅल्शियम असलेले पदार्थ खायचे नाहीत वगैरे सूचना करून दूधही प्यायचे नाही असे सांगितले. विठ्ठलराव पटकन म्हणाले, 'म्हणजे 'गवळण'सुद्धा. . . म्हणायची नाही !' इस्पितळात असतानाही त्यांची विनोदबुद्धी जागृत असल्याचे पाहून तेथील सर्वांनी त्यांना कौतुकाने दाद दिली.

■

ना. स. फरांदे आणि किस्से

शाब्दिक कोट्या, मार्मिक विनोद करून सभेत खसखस पिकवणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ना. स. फरांदे चांगलेच प्रसिद्ध आहेत. विधान परिषदेत अनेक वेळा त्यांनी आपल्या विनोदी स्वभावाची प्रचीती दिली आहे. प्रचलित असलेल्या शब्दप्रयोगांमधील अर्थविसंगतीवर बोट ठेवून विनोदनिर्मिती करण्यात ते वाकबगार. विविध सभांमध्ये या स्वरूपाची त्यांनी केलेली विधाने पाहा–

जे नाही 'पब्लिक'

' 'पब्लिक स्कूल' ही 'पब्लिक' कशी असू शकते? म्हणजे धनाढ्य मुलांसाठी असलेल्या शाळेला आपण 'पब्लिक' स्कूल म्हणायचे !'

■

न बोलणारा तो 'स्पीकर'

विधान परिषदेच्या सभापतीस 'स्पीकर' म्हणतात. 'स्पीकर' म्हणजे त्यांनी बोलायचं नाही, नुसतं ऐकायचं ! सभागृहात बोलायला वाव नसल्यामुळे, मग सभापती बोलायचा सर्व 'बॅकलॉग' बाहेरच्या सभांमध्ये भरून काढतात.

■

बडबड आणि विकेटकीपर

बऱ्याच वेळा यष्टिरक्षक काही ना काही बडबड करून प्रतिस्पर्धी संघाच्या फलंदाजाचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत असतो. या संदर्भात एकदा फरांदे म्हणाले, 'विकेटकीपर म्हणजे आपल्या संघासाठी विकेट सांभाळणारा; पण कधी कधी तो (बडबड करून) प्रतिस्पर्धी संघाच्या फलंदाजाची विकेट उडवण्याचंही काम करत असतो.

■

विलासराव देशमुख आणि किस्से

दाढी, टक्कल आणि वृक्षारोपण

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे वाग्विलास आणि समयसूचकता यासाठी सर्वज्ञात आहेत. त्यांनी विधानसभेतील एक गमतीदार किस्सा एका भाषणात सांगितला होता तो असा–

नानासाहेब एंबडवार वनमंत्री होते तेव्हाची गोष्ट. सभागृहात बाळासाहेब ठुबे

नावाचे सदस्य होते. भरपूर दाढी ही नानाभाऊंच्या व्यक्तिमत्त्वातील लक्षवेधी गोष्ट, तर ठुबेंच्या व्यक्तिमत्त्वातील ठळक गोष्ट म्हणजे त्यांचे टक्कल.

एकदा ठुबे नानाभाऊंच्या दाढीकडे पाहून मिश्किलपणे म्हणाले, 'वनमंत्र्यांच्या केवळ चेहऱ्यावरच वनाची 'विशेष वाढ' झाल्याचे दिसते.'

थोड्या वेळाने संधी मिळताच विलासरावांनी ठुबे यांच्या 'टकला'कडे पाहत प्रतिटोला दिला, 'अहो, वृक्षारोपणासाठी एवढी सपाट जमीन आणखी कुठे मिळेल?'

■

मतदार, पाहुणचार आणि शिक्के

सहकारक्षेत्रातील निवडणुकांमध्ये होणारी मतदारांची पळवापळवी, त्यांची होणारी खातिरदारी याबाबतचा एक मासलेवाईक चुटका विलासरावांनी सांगितला तो असा–

एका निवडणुकीत एका उमेदवाराची निवडणूक-निशाणी होती 'सायकल', तर प्रतिस्पर्ध्याची होती 'मोटर-सायकल'.

'सायकल' निशाणी असलेल्या उमेदवाराने आपल्या मतदारांना खूष करण्यासाठी त्यांचा बराच 'पाहुणचार' केला. त्या पाहुणचारामुळे ते चांगलेच तृप्त झाले. पण मतपत्रिकेवर शिक्का मारण्याची वेळ आली, तेव्हा मतदारांनी विचार केला– ज्या उमेदवाराने आपली एवढी चांगली खातिरदारी केली, त्याची निशाणी 'सायकल' कशी असेल, ती 'मोटर-सायकल'च असावी– झालं, त्यांनी 'मोटर-सायकल'वरच शिक्के मारले आणि प्रतिस्पर्ध्याचे आपसुखच फावले. तात्पर्य, मतदारांची अतिरिक्त खातिरदारी अशी अंगावर येते.

■

मृत बापाने केले मतदान !

डॉ. अरुण टिकेकर यांनी आपल्या एका भाषणात भारतीय लोकशाहीतील मतदानप्रकियेत घडणाऱ्या विसंगतीपूर्ण गोष्टींवर बोट ठेवताना सांगितलेला एक चुटका असा–

एका गावातील गोष्ट. रस्त्याच्या कडेला एक मुलगा रडत बसला होता. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विजयी झालेला एक स्थानिक नेता तिथून जात होता. मुलाला रडताना पाहून त्याने विचारले, 'का रे बाबा, का रडतोयस?'

'माझ्या बाची माझ्यावरील प्रीती कमी झालीया, लई आटलीया.' मुलगा रडत रडत म्हणाला.

'अरे, पण तुझा बा तर तीन वर्षांपूर्वीच स्वर्गवासी झाला ना?' नेत्याने विचारले.

'व्हय, खरंय, पण निवडणुकीच्या वक्ताला मतदान कराया आला व्हता म्हंत्यात; पर मला मात्र न भेटताच निघून गेला !'

■

स्मशानभूमीला 'शॉर्टकट'

पुरंदर तालुक्यातील पिंपरे गावात, जिल्हा परिषद अध्यक्ष जालिंदर कामठे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा चालली होती. या सभेत नशापाणी करून तर्रर झालेला एक ग्रामस्थ वारंवार 'स्मशानभूमीत जाण्यासाठी रस्ता झालाच पाहिजे,' अशी जोरात ओरडून मागणी करीत होता आणि सभेत व्यत्यय आणीत होता.

श्री. कामठे यांचे भाषण चालू असताना जेव्हा त्या मद्यप्याने पुन्हा असाच ओरडा केला, तेव्हा कामठे मिश्किलपणे म्हणाले, 'तुमच्यासाठी स्मशानभूमीकडे जाण्याचा रस्ता लवकरच करू, पण एवढी घाई करू नका !' हा टोमणा उपस्थितांच्या पटकन लक्षात आला आणि त्यांनी टाळ्या वाजवून त्यांना उत्स्फूर्तपणे दाद दिली.

■ ■ ■

६

पाश्चात्त्य आणि विनोद

ओ हेन्री आणि लाथा

पाश्चात्त्य लेखक ओ हेन्री यांचे आणि संपादकांचे नेहमी वाद होत असत, कारण ते अनेक संपादकांना एकाच वेळी कथा लिहून देण्याचे आश्वासन देत असत आणि नंतर सहा-सहा महिने टाळाटाळ करीत असत. त्यांच्याबद्दल अशीही तक्रार होती की 'रोज एक व्हिस्कीची बाटली पिऊन आपण रोज एक कथा पूर्णपणे लिहू शकतो,' अशी ते बढाई मारतात. व्हिस्कीची बढाई ते बरोबर खरी करतात, पण कथा मात्र पुऱ्या करत नाहीत. :

एकदा याच कारणाने संतापलेल्या एका प्रकाशकाने त्यांना संतप्त निरोप पाठवला, 'आज संध्याकाळपर्यंत तुमच्या कथा आल्या नाहीत, तर मी स्वत: येऊन तुम्हांला लाथा घालीन. लक्षात ठेवा, मी माझी आश्वासनं पाळत असतो.'

ओ हेन्रीने शांतपणे उत्तर पाठवले, 'कथा पायाने लिहिता आल्या असत्या, तर मीही आश्वासनं बरोबर पाळली असती !'

■

पी.जी. वुडहाऊस आणि लंच

रविवारचा दिवस. सकाळचा वेळ आळसात लोळून काढल्यावर पी. जी. वुडहाऊसना काहीतरी सुचले. त्यांनी आपल्या प्रकाशकाच्या घरी फोन केला. फोन स्वत: प्रकाशक महोदयांनी घेतला. थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर वुडहाऊस म्हणाले, 'माझ्याबरोबर लंच घेणं आवडेल का तुम्हांला?'

'वा ! वा ! नक्कीच !' प्रकाशक महोदय आनंदाने उद्गारले.

'मग लंचसाठी तुमच्या घरी येतोय. पंधरा मिनिटांत हजर होईन.' पीजींनी फोन ठेवून लांबलचक स्मित केले.

■

बर्नार्ड शॉ, लग्न आणि संदेश

एका समारंभात काही तरुण-तरुणींनी जॉर्ज बर्नार्ड शॉ यांना घेरले. हास्य-विनोद सुरू झाले.

तशातच एका अत्यंत सुंदर तरुणीने त्यांना विचारले, 'मिस्टर शॉ, आजच्या तरुणींना तुम्ही कोणता संदेश द्याल?'

'शक्य तितक्या लवकर त्यांनी लग्नं करावीत.' जॉर्ज बर्नार्ड शॉ तात्काळ म्हणाले.

'आणि तरुणांना तुमचा संदेश?' एका तरुणाने पुढे सरसावत विचारले.

'तरुणांनी शक्य होईल तोवर लग्न टाळण्याचा प्रयत्न करावा !' शॉ म्हणाले.

■

लिंकन आणि हरवलेलं गाढव

अब्राहम लिंकनला एकदा पार्लमेंटमध्ये त्याच्या प्रतिस्पर्ध्याने, 'ह्याचा बाप गाढवावरून दारूची पिंपं वाहून नेण्याचा धंदा करायचा,' असं बोलून खाली खेचायचा प्रयत्न केला.

त्यावर अब्राहम लिंकनने लगेच उत्तर दिलं, 'खरं आहे, पण आता माझ्या बापाने तो धंदा सोडून दिला. का ठाऊक आहे? त्यांचं गाढव हरवलं. त्यांना काय कल्पना सध्या ते पार्लमेंटमध्ये आलं आहे !'

■

वुडी ॲलन आणि स्विमिंग

वुडी ॲलनच्या रशिया दौऱ्याच्या वेळी मॉस्कोतील 'प्रावदा'च्या प्रतिनिधीने त्यांची मुलाखत घेतली. काही प्रश्न विचारून झाल्यावर त्याने विचारले, 'मि. ॲलन, तुम्हांला पोहता येतं?'

'येतं कधी कधी.' ॲलन गंभीरपणे म्हणाले.

'म्हणजे?' प्रतिनिधी या उत्तराने चाटच पडला.

'म्हणजे मी जेव्हा पाण्यात असतो तेव्हाच पोहता येतं मला. . . एरवी नाही.' ॲलन म्हणाले.

■

मार्क ट्वेन आणि चमत्कृती

प्रसिद्ध कथालेखक मार्क ट्वेन यांची अतिशयोक्तीवर पकड होतीच; पण कल्पना-चमत्कृतिपूर्ण कथनाची शैलीही वैशिष्ट्यपूर्ण होती. केऊक नावाच्या गावातील उन्हाळ्याचे या पद्धतीने वर्णन केले आहे ते असे–

'ह्या केऊकला माझ्या शरीरावर आईसक्रीम सांडल्यामुळेसुद्धा शर्ट जळून भोक पडले ! जेकिन्सबाई तर मला सांगत होत्या की त्यांना स्वयंपाकाकरता चूल लागतच नाही. टेबलावरची संगमरवरी फरशीच एवढी तापते की तिच्यावर भांडे ठेवले की जेवण शिजून तयार ! केऊकचे बिशप मला एकदा म्हणाले होते की, 'चर्चमध्ये मर्तिकाचे विधी होतात तेव्हा त्यांनी मृताच्या नातेवाइकांना रडायची सक्त मनाई केली आहे. फर्निचरवर अश्रू पडले तर तेथे जळल्याचे डाग पडतात !' '

■

लॉईड जॉर्ज आणि उंची

इंग्लंडचे एकेकाळचे पंतप्रधान लॉईड जॉर्ज एकदा भाषण करावयास गेले असता त्यांचे परिचय करून देणारा म्हणाला, 'लॉईड जॉर्ज हे सर्वच दृष्टीने, बुद्धीने तसेच शरीराने मोठे असतील, अशी आमची कल्पना होती; परंतु शरीराने ते बरेच खुजे आहेत हे आपल्याला दिसतेच आहे.'

लॉईड जॉर्ज जेव्हा बोलावयास उठले तेव्हा ते शांतपणे म्हणाले, 'आमच्याकडे उत्तर वेल्समध्ये माणसाची उंची त्याच्या मानेच्या वरच्या भागावरून मोजतात. तुमच्याकडे उंची बहुधा मानेच्या खालच्या भागाकडून मोजतात, असे दिसते !'

■

डिझ्रेली, तत्त्व आणि रखेल्या

डिझ्रेली व ग्लॅडस्टन हे राजकारणात वैरी होते. एकदा पार्लमेंटची बैठक संपल्यावर दोघांची व्हरांड्यात भेट झाली. पार्लमेंटची बैठक चालू असताना डिझ्रेली जे बोलला, त्यामुळे ग्लॅडस्टन भयंकर संतापला होता. त्याचा राग

अजूनही शांत झाला नव्हता. तो डिझ्रेलीला म्हणाला, 'महाशय, तुमचा शेवट एकतर फासावर होईल, नाहीतर गुप्तरोग होऊन तुम्ही मराल.'

डिझ्रेलीने आपला चष्मा काढून पुसता आणि तो शांतपणे म्हणाला, 'मिस्टर ग्लॅडस्टन, मला वाटतं ते मी तुमच्या तत्त्वांना कवटाळतो की तुमच्या रखेल्यांना यावर अवलंबून राहील !'

■

क्रिप्स आणि खिशातला कागद

भारतावर इंग्रजांचे राज्य असताना काँग्रेसशी शिष्टाई करण्याकरिता आलेले सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स हे एक नामांकित वकील होते. एकदा कोर्टात ते केस चालवीत असताना, त्यांच्या विरुद्ध बाजूने जो वकील उभा होता तो चांगला उंचापुरा व आडदांड होता. दोघांचा युक्तिवाद चालू असताना तो वकील म्हणाला, 'हे पाहा मिस्टर क्रिप्स, तुम्ही इतके अननुभवी आहात की मी तुम्हांला सहज खिशात घालीन.'

त्यावर क्रिप्सनी शांतपणे उत्तर दिले, 'तुम्ही तसं केलंत तर तुमच्या डोक्यातल्यापेक्षा तुमच्या खिशात कायद्याचं ज्ञान अधिक असेल !'

■

लॉर्ड वेव्हेल, वाघ आणि मतदार

इ. स. १९४६ साली लॉर्ड वेव्हेल हे भारताचे व्हाईसरॉय असतानाची गोष्ट. ख्रिसमसमध्ये त्यांच्यासाठी वाघाच्या शिकारीचा बंदोबस्त, प्रख्यात शिकारी आणि शिकारकथा लेखक जिम कार्बेट यांच्यावर सोपविला होता.

लॉर्ड वेव्हेल यांनी लिहिलं आहे, 'वाघ आणि जंगल या विषयांवरचं जिम कार्बेटचं बोलणं असामान्य, रुचिपूर्ण होतं. ते मला आणखी ऐकता आलं असतं, तर बरं झालं असतं. भारतीय वाघाच्या भवितव्याबद्दल कार्बेट निराश दिसतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे भारतात आता तीन ते चार हजार एवढेच वाघ राहिले आहेत. येत्या दहा-पंधरा वर्षांत भारतात बऱ्याच भागातले वाघ नाहीसे होतील याचं प्रमुख कारण म्हणजे भारताचे राजकीय नेते शिकारी नाहीत आणि वाघ मतदार नाहीत.'

■ ■ ■

७

संमिश्र

ट्युमर आणि ह्युमर

जीवनावर मार्मिक टिपण्णी करणारी रेखाटने साकार करणारे सिद्धहस्त हास्यचित्रकार श्री. श्याम जोशी यांना तल्लख विनोदबुद्धीची देणगी होती. त्यांना एखादा विनोद आवडला, उत्स्फूर्त हसू आले, तर ते खाजगी बैठकीत त्या व्यक्तीस बक्षीस देत. श्याम जोशी यांची ब्रेन ट्यूमरची शस्त्रक्रिया झाल्यावर डॉक्टरांना त्यांनी विचारले, 'ट्यूमर काढताना माझ्या डोक्यातल्या 'ह्युमर'ला धक्का नाही ना लागला?'

■

आर. के. लक्ष्मण आणि किस्से

रसेल आणि शून्य

एकदा प्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री. आर. के. लक्ष्मण लंडनला गेले असताना विश्वविख्यात तत्त्वज्ञानी व गणिततज्ज्ञ सर बर्ट्रांड रसेल यांना भेटावयास गेले. रसेल यांनी घराच्या दरवाज्यातच तोंडात पाईप धरून स्मित करीत लक्ष्मण यांचे स्वागत केले. त्यांच्यात मनसोक्त गप्पा झाल्याने श्री. लक्ष्मण सुखावून गेले.

गप्पांच्या ओघात पाईपमध्ये आरामात तंबाखू भरत, सर रसेल म्हणाले, 'शोध लावण्याचे बाबतीत तुम्हा भारतीयांची कामगिरी शून्यच आहे.'

शेरा ऐकून लक्ष्मण चक्रावलेच. आपल्या देशावरील या हल्ल्याला कसं प्रत्युत्तर द्यावं अशा विचारात ते असतानाच, पुन्हा सर रसेल पुटपुटले, 'एकदम साफ शून्य !' आणि मग हसऱ्या नजरेनं त्यांच्या खास शैलीत, ओठात घट्ट पाईप पकडून ते लक्ष्मण यांच्याकडे बघत राहिले.

या माणसात किती दुष्टपणा भरलाय असं वाटून, संतापावर काहीसं नियंत्रण ठेवून श्री. लक्ष्मण म्हणाले, 'श्रीयुत रसेल, तुमचा शेरा न्याय्य नव्हे. बुद्धिबळाचं काय? त्याचा शोध कुणी लावला? तत्त्वज्ञानाच्या कल्पना, खगोल शास्त्र?' लक्ष्मण एकामागोमाग एक उदाहरणं देऊ लागले. तेव्हा आपल्या निळ्या डोळ्यांनी खट्याळपणे त्यांच्याकडे पाहत रसेल म्हणाले, 'तरुण पोरा, जरा शांत हो. अरे, तुम्हा भारतीयांना मी फार मोठे श्रेय देतोय, प्रशंसा करतोय. शून्यांची कल्पना हा गणितशास्त्रातील फार मोठा शोध आहे आणि त्याचे सारे श्रेय भारतीय विचारवंतांना जाते !'

■

राजीव गांधी, लठ्ठपणा आणि 'लक्ष'

श्री. लक्ष्मण हे 'टाइम्स'चे व्यंगचित्रकार. टाइम्सच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त नेहरू ते राजीव गांधी या काळातील लक्ष्मण यांच्या निवडक व्यंगचित्रांचा संग्रह 'द इलोक्वंट ब्रश' या नावाने प्रसिद्ध झाला. त्याचे औपचारिक प्रकाशन त्या वेळचे पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांच्या हस्ते झाले. राजीव गांधी यांना एक सवय होती. त्यांना कोणत्याही समस्येबद्दल सांगितले की, 'मी त्यात लक्ष घालीन,' असे ते म्हणायचे. त्यांची ही सवय लक्ष्मण चांगलेच जाणून होते.

याप्रसंगी लक्ष्मण व राजीव गांधी यांची त्यांच्या सभोवतीच्या गराड्यातच भेट झाली. तेव्हा स्मित करीत राजीवजी म्हणाले, 'मला तुमची व्यंगचित्रे आवडतात, पण तुम्ही मला फारच लठ्ठ दाखवता बुवा !'

त्यावर क्षणार्धात लक्ष्मण म्हणाले, 'मी त्यात लक्ष घालीन.'

सर्वत्र एकच हशा पिकला.

■

'ऑप्टिमस सिद्धान्त' आणि तरुणी

साधारण इ. स. १९४९-५० ची गोष्ट. बी. ए. ची पदवी प्राप्त केल्यावर प्रा. राम जोशी कॉलेजमध्ये फेलो म्हणून काम करताना अर्थशास्त्र हा विषय शिकवीत असत. त्यांची विनोदबुद्धीही चांगलीच तल्लख होती. 'ऑप्टिमस' ही कल्पना सांगताना ऐन तारुण्यातील प्रा. जोशी म्हणाले, 'ही एक अशी पातळी आहे की तिच्याहून कमी किंवा जास्त असणे बरोबर नाही.' नंतर

गमतीने ते म्हणाले की, 'एखादी तरुण मुलगी इतकी बांधेसूद व आकर्षक असते की तिच्यात काही अधिक जास्त किंवा बारीक असेल तर तिचा गोडवाच जाईल.'

■

फेव्हिकॉल आणि भंगलेले हृदय

ब्रिगेडियर शिवाजीराव घोरपडे पुण्याच्या कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग मध्ये वर्ग घेत असताना त्यावेळी नवीनच असलेल्या 'फेव्हिकॉल'चा विषय निघाला. त्यावर बोलताना ते इंग्रजीमध्ये म्हणाले, 'या फेव्हिकॉलने कुठलीही वस्तू कोणत्याही वस्तूला जोडता येते.' थोडे थांबून ते पुढे मिश्किलपणे म्हणाले, 'हृदयाचे झालेले तुकडे सोडून !'

■

बोगदा आणि चुंबन

'अमृत' मासिकातील एका लेखात मुंबईच्या श्री. व सौ. मराठे यांनी सांगितलेला एक किस्सा–

मराठे दांपत्य कोकण रेल्वेने गोव्यात चालले होते. त्यांच्या पलीकडच्या बाकावर एक हनिमूनला निघालेले तरुण जोडपे बसलेले होते. काही वेळाने रेलगाडी बोगद्यातून चालली होती, तेव्हा अचानक दिवेही गेले.

बोगदा संपल्यावर तरुण आपल्या पत्नीला म्हणाला, 'डार्लिंग, बोगदा एवढा मोठा आहे हे मला अगोदर माहीत असतं तर मी तुझं चुंबनच घेतलं असतं.'

तरुणी किंचाळत म्हणाली, 'अय्या, मग ते चुंबन कुणी घेतलं?'

मराठे यांनी हा किस्सा सांगून अशी सूचना केली आहे की बोगदे मोठे असल्याने 'बॅटरी' बरोबर ठेवण्यास विसरू नये.

■

नट, बोगदा आणि चुंबन

पाश्चात्त्य देशातल्या रेलगाड्यांमध्ये आपल्यासारखी गर्दी नसते. अशाच एका रेल्वेतून तेथील तरुण, देखणा व अतिशय लोकप्रिय असा अभिनेता एकदा प्रवास करीत होता. त्याच्या समोरच्या बाकावर दोन प्रौढा बसल्या

होत्या. त्या दोघीही त्या नटाशी, काहीना काही विषय काढून एकसारख्या बोलण्याचा प्रयत्न करीत होत्या व या तरुणाला ते त्रासदायक वाटत होते. त्यांना कसं गप्प करावं या विचारात तो असताना त्यांची रेलगाडी एका अंधाऱ्या बोगद्यात शिरली आणि त्यांच्या डब्यातील दिवे लागण्यास अंमळ उशीर झाला. तेवढ्यात कल्पना सुचून त्या तरुणाने आपल्याच हाताचा पंजा आपल्या ओठाला लावून चुंबनाचा आवाज केला. डब्यात दिवे आल्याबरोबर त्याने त्या दोन प्रौढांकडे पाहून मानभावीपणाने प्रश्न केला की, 'तुमच्यापैकी नक्की कुणी माझे चुंबन घेतले?' हे ऐकून त्या दोघी एकमेकींकडे संशयाने आणि रागाने पाहू लागल्या आणि त्यांचे संभाषण थांबले आणि अर्थातच त्या अभिनेत्याचा पुढचा प्रवासही शांतपणे पार पडला.

■

गाडी बंद हॉर्न चालू

एकदा माजी रणजीपटू व क्रिकेट प्रशिक्षक वासू परांजपे यांची गाडी रस्त्यात बंद पडली. मागच्या गाडीतला माणूस सतत हॉर्न वाजवित राहिला. वासू जाम वैतागले. एक तर गाडी सुरू होईना व मागच्या माणसाच्या गाडीचा हॉर्न थांबेना.

थोड्या वेळाने वासू परांजपे त्या गाडीवाल्याकडे गेले व शांतपणे म्हणाले, 'तुम्हीच बघा जरा माझी गाडी सुरू करता येतेय का– तेवढा वेळ मी तुमचा हॉर्न वाजवीत बसतो !'

■

शेषन आणि त्यांचे किस्से

घड्याळ आणि बडगा

श्री. शेषन नियोजन मंडळाचे सदस्य असताना त्यांना आढळून आले की, बहुतांश बैठका ठरलेल्या वेळेपेक्षा किमान एक तास किंवा त्याहून अधिक उशिरा सुरू होतात. तेव्हा एके दिवशी त्यांनी आपल्या दालनातील भिंतीवरचं घड्याळ काढून नियोजन मंडळाच्या सचिवांकडे पाठविलं. त्यासोबतच्या चिठ्ठीत त्यांनी लिहिलं होतं, 'ज्या योजनाभवनात कोणतीच गोष्ट वेळेवर होत नाही तेथे घड्याळाची काहीच गरज नाही.'

■

कॅलेंडर आणि बडगा

वरील प्रसंगानंतर शेषन यांच्या हेही लक्षात आलं की नियोजन मंडळाच्या बैठका तर ठरल्या वेळी होत नसतच, पण त्या ठरल्या दिवशीही होत नसत व त्या पुढे ढकलल्याची माहितीही ज्या त्या दिवशी आधी देत नसत. नियोजन मंडळाचे सचिव कृष्णस्वामी यांना अचानक एके दिवशी आपल्या टेबलावर नीट गुंडाळून ठेवलेलं कॅलेंडर पाहून आश्चर्यच वाटलं. त्यासोबत शेषन यांची चिठ्ठी होती. त्यात म्हटलं होतं, 'यापूर्वी माझ्या खोलीतील घड्याळ मी तुम्हांला पाठवून दिलं होतं. कृपया आता या कॅलेंडरचा स्वीकार करावा. योजनाभवनाला न घड्याळाची गरज ना कॅलेंडरची !'

■

सी. डी. देशमुख आणि चिंता

प्रा. परमानंद शेट्ये बेळगावला ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्राध्यापक असताना, त्यांच्या कॉलेजला एकदा सी. डी. देशमुखांनी भेट दिली. त्यावेळी प्रा. शेट्यांनी सीडींना विचारले, 'सर, तुमचे नाव चिंतामण आहे की चिंतामणी?' त्यावर सी. डी. हसून म्हणाले, 'तुम्ही चांगला प्रश्न विचारलात. माझे खरे नाव चिंतामणी आहे; परंतु लोकांनी मला माझ्या नावापुढे 'राव' लावण्यासाठी माझे नाव सोयीस्कररीत्या बदलून मला चिंतामण करून ठेवले. मी माझ्या आयुष्यात कधीच मणभर चिंता केलेली नाही !'

■

बेंजामिन आणि बिन-जामीन

पुणे महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त बेंजामिन यांनी जड वाहनांना शहराच्या काही भागांत बंदी घातल्याच्या निषेधार्थ व्यापारी आणि माथाडी कामगारांनी आंदोलन छेडले होते. त्या निमित्ताने अनेक ठिकाणी जाहीर सभाही झाल्या होत्या.

अशाच एका सभेत बोलताना 'हमाल पंचायत'चे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव यांनी आपल्या खुसखुशीत शैलीने आयुक्त बेंजामिन यांच्यावर टीका केली.

ते म्हणाले, 'वेळेत फक्त चार तासांची सवलत मागणाऱ्या हमालांना तुम्ही तुरुंगात टाकता; पण अशा तुरुंगाची भीती तुम्ही कुणाला दाखवता? तुम्ही

आयुक्त असाल, अगदी बेंजामिन असाल, पण बेंजामिन साहेब, एक गोष्ट लक्षात ठेवा, आम्ही तर सारे 'बिन जामीन' आहोत, तेव्हा आम्हांला शिक्षेची भीती दाखवू नका व आम्हां बिन-जामीनवाल्यांचे आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न करू नका.'

■

'बेस्ट-मॅनेजर', टेनिस आणि कुस्ती

एकदा मुंबई महानगरपालिकेच्या सभेत 'बेस्ट' कंपनीवर सपाटून टीका झाली. 'बेस्ट'च्या जनरल मॅनेजरना ताबडतोब सभागृहात पाचारण करण्याची मागणी झाली.

जनरल मॅनेजर एक आय. ए. एस. अधिकारी होते. ते निष्णात टेनिसपटूही होते. महानगरपालिकेकडून बोलावणं येताच ते टेनिसचा सामना अर्धवट टाकून टेनिसपटूच्या वेषातच धावतपळत सभागृहात आले. सभासदांच्या शंकांची त्यांनी समाधानकारक उत्तरं दिली.

श्री. आप्पा पेंडसे हे एक रसिक नगरसेवक होते. ते जनरल मॅनेजरच्या वेषाकडे पाहून गमतीने म्हणाले, 'बरं झालं साहेब, टेनिस खेळायलाच गेले होते, कुस्ती खेळायला गेले असते आणि आखाड्यातून असे आले असते तर. . .?'

त्यावर कमिशनर हसून म्हणाले, 'अहो, कुस्ती खेळणारा माणूस नगरसेवक, मंत्री किंवा मुख्यमंत्रीही होऊ शकतो; पण आय. ए. एस. कसा होईल?'

त्यावर सभागृहात एकच हशा उसळला.

■ ■ ■

संदर्भ-सूची

प्रस्तुत संकलनाचे स्रोत खालीलप्रमाणे

पुस्तके	**लेखक**
बटाट्याची चाळ	पु. ल. देशपांडे
अपूर्वाई	पु. ल. देशपांडे
गणगोत	पु. ल. देशपांडे
रास	सुमा करंदीकर
बाईंडरचे दिवस	कमलाकर सारंग
लक्ष्मणरेषा	आर. के. लक्ष्मण (अनुवाद : अशोक जैन)
एकला चलो रे	शिरीष कणेकर
शेषन	गोविंद कुट्टी (अनुवाद : अशोक जैन)
पाहता वळून मागे	दिनकर जोशी
रवींद्रनाथांच्या सहवासात	मैत्रेयी देवी
एक अविस्मरणीय मामा	गंगाधर महाम्बरे
क्लोरोफॉर्म	डॉ. अरुण लिमये
विनोद : एक व्याख्यान	डॉ. अ. वा. वर्टी

नियतकालिके	**लेखक**
'लोकसत्ता', दिवाळी १९९९	शरद तळवलकर (सखा पुरुषोत्तम)
'पोलिस टाइम्स' दिवाळी १९९९	सुभाष भेंडे (किस्से विलायती लेखकांचे)
'ग्राहक दिन', दिवाळी १९९९	म. द. हातकणंगलेकर

'किशोर', दिवाळी २०००	देवीचरण राठोड
'आवाज', दिवाळी २०००	अशोक पाटोळे (माझी पु ल देवता)
'महाराष्ट्र टाइम्स', २०००	
साप्ताहिक सकाळ, जून २४,२०००	मुकुंद टाकसाळे
सा. लोकप्रभा, जून ३०,२०००	प्रवीण काणेकर
'अमृत'	
दिवाळी अंक १९९९	आप्पासाहेब जाधव
जून, २०००	श्री. ग. भा. मराठे व सौ. रोहिणी मराठे
मार्च व ऑगस्ट २०००	देवीचरण राठोड
जुलै २०००	श्रीकांत मोघे
जुलै २०००	राम गबाळे
दैनिक लोकसत्ता	
मार्च १३, जून ४, १८, २०००	विजय कुवळेकर
ऑगस्ट २८, २०००	म. का. पारुंडेकर
ऑगस्ट २९, २०००	सुधीर गाडगीळ (ताजंतवानं)
ऑक्टोबर ३१, २०००	सुधीर गाडगीळ (ताजंतवानं)
डिसेंबर १०, २०००	अविनाश बिनीवाले (बोलु कवतिके)
फेब्रुवारी ७, २०००१	राम गबाले
मे २५, २००१	प्रतिनिधी (समीक्षा - 'देशमुखी')
जून ८, २००१	सुधीर नांदगावकर (कवडसे)
जून १०, २००१	सुनील आणावकर (लोकरंग)
जुलै ८, २००१	परमानंद शेट्ये

■ ■ ■

नामवंतांचे विनोद

पु. ल. देशपांडे, आचार्य अत्रे यांनी विपुल विनोदी साहित्य निर्माण केले. त्यांच्या व्यक्तिगत जीवनात व अनौपचारिक बैठकीतही त्यांनी हास्याचे अनेक फवारे उडविले होते.

विं. दा. करंदीकर, माधव जूलियन यांच्यासारखे कवी, पी. जी. वुडहाऊस, मार्क ट्वेन यांच्यासारखे पाश्चात्त्य साहित्यिक हे सुद्धा उत्स्फूर्त विनोद करण्यात वाकब्गार होते; रवींद्रनाथ टागोर, बर्नाड शॉ यांच्यासारखे गंभीर प्रकृतीचे नामवंत असोत वा विलासराव देशमुख यांच्यासारखे राजकारणी असोत, विनोदाशी कुणाचेच वावडे नसते.

नाट्य-चित्रसृष्टीतील नाना पाटेकर, अशोक सराफ, अमोल पालेकर यांच्यासारखे कलावंतही पडद्यामागे खसखस पिकवीत असतात.

विविध क्षेत्रांतील अशा नामवंतांनी सांगितलेले किंवा ते आपल्या कार्यात व्यस्त असताना घडलेले उत्स्फूर्त असे अनेक दुर्मिळ विनोद आनंद घोरपडे यांनी या पुस्तकात टिपले आहेत. हे किस्से आपल्याला आनंद तर देतीलच; पण आपल्या अनौपचारिक बैठकीतही रंगत आणतील.

रोहन प्रकाशन

